दैनिक

www.epaper.rajyaloktantra.com

# राज्य लोकतंत्र

नवी दिशा... नवे विचार.....

● छत्रपती संभाजीनगर ● पुणे ● अहिल्यानगर ● जालना ● धाराशिव जिल्ह्यात वितरीत होणारे दैनिक

बीड – महाराष्ट्र | वर्ष–६ | अंक–४६ | मंगळवार दि.५ मे २०२६ | RNI No.: MAHMAR/2021/85884 | NO.L SB/BEED/RNP-206/2024-26 | पाने–६ | किंमत ३ रूपये

## संपादकीय

### आता तरी जागा होईल का राजधर्म?

पुणे जिल्ह्याच्या मातीत आणि महाराष्ट्राच्या पुरोगामी परंपरेत अवघ्या काही तासांच्या अंतराने घडलेल्या तीन घटनांनी केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण केला नाही, तर समाजाच्या आत्म्यालाच हादरवून सोडले आहे. नसरापूरमध्ये एका ६५ वर्षीय नराधमाने चार वर्षांच्या चिमुरडीवर केलेला अत्याचार आणि तिची दगडाने ठेचून केलेली हत्या, चाकणमध्ये तीन वर्षांच्या निष्पाप बालकावर शेजाऱ्यानेच केलेले

# महिनाभरात कर्जमाफीचा निर्णय

## शेतकरी मित्र योजनेतून ११ हजार तरुणांना रोजगार; कृषिमंत्र्याची घोषणा

पुणे । प्रतिनिधी

**पुढच्या एका महिन्याच्या आत शेतकरी कर्जमाफीचा मोठा निर्णय घेतला जाणार असून, खुद्द मुख्यमंत्री याची घोषणा करतील, अशी महत्त्वाची माहिती राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली आहे. तसेच कृषी विभागाच्या योजना घराघरात पोहोचवण्यासाठी आता शेतकरी मित्र ही नवी संकल्पना राबवण्यात येणार असल्याचेही त्यांनी स्पष्ट केले. कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी पेरणी पुर्व कृषी आढावा बैठकीनंतर ते बोलत होते.**



गेल्या अनेक दिवसांपासून शेतकरी कर्जमाफीच्या निर्णयाकडे डोळे लावून बसले होते. याबाबत माहिती देताना मंत्री भरणे म्हणाले की, कर्जमाफीबाबतची सर्व तांत्रिक माहिती गोळा करण्याचे काम पूर्ण झाले आहे. एका महिन्याच्या आत यावर अंतिम शिक्कामोर्तब होईल.

### कृषी विभाग शेतकऱ्यांच्या मदतीला


वातावरणातील बदलांमुळे उद्भवणाऱ्या एल-निनोच्या संकटाचा सामना करण्यासाठी कृषी विभागाने कंबर कसली आहे. मंत्री भरणे यांनी आज अधिकाऱ्यांची विशेष कार्यशाळा घेऊन खरीप हंगामाचे नियोजन केले. येत्या काळात चारा आणि खतांचा तुटवडा भासू नये, यासाठी कृषी अधिकाऱ्यांनी कार्यालयात न बसता थेट शेतकऱ्यांच्या बांधावर (फिल्डवर) जाऊन मार्गदर्शन करावे, असे कडक निर्देश त्यांनी दिले आहेत.

यामुळे राज्यातील लाखो शेतकऱ्यांना मोठा आधार मिळणार आहे. याशिवाय, मागील दोन महिन्यात झालेल्या अवकाळी पावसाची मदतही संबंधित शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवली जात असल्याचे त्यांनी सांगितले. राज्यातील कृषी सहाय्यकांच्या मदतीसाठी आणि ▶▶ पान २ वर

# बारामतीत सुनेत्रा पवारांचा मोठा विजय, देशातील सर्वाधिक मताधिक्क्याचा विक्रम

बारामती । प्रतिनिधी

**बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत राष्ट्रवादी काँग्रेसच्या उमेदवार उपमुख्यमंत्री सुनेत्रा पवार यांनी विक्रमी मताधिक्क्यांसह एकतर्फी विजय मिळवला. २४ व्या फेरीअखेरच्या आकडेवारीनुसार, सुनेत्रा पवार यांना एकूण २ लाख १८ हजार ९३० इतके मते मिळाली. २०१९ मधील निवडणुकीत अजित पवार यांनी १ लाख ६५ हजार मताधिक्य घेतले होते. त्यांच्याहून अधिक मताधिक्य सुनेत्रा पवार यांना मिळाले.**



**सुनेत्रा पवार**
मिळालेली मतं
2,18,806
विजयी मताधिक्य
2,17,875



**अक्षय कर्डिले**
मिळालेली मतं
1,40,093
विजयी मताधिक्य
1,12,587

उपमुख्यमंत्री असताना अजित पवार यांचे विमान अपघातात निधन झाले. या रिक्त जागेसाठी पोटनिवडणूक घेण्यात आली. त्यांचा निकाल आज सोमवारी (दि.४ मे) जाहीर झाला. सुनेत्रा पवार यांनी देशातील सर्वाधिक मताधिक्क्याचाही विक्रम मोडला. उत्तर प्रदेशातील २०२२ मधील निवडणुकीत साहिबाबाद मतदारसंघातून सुनील शर्मा यांनी २ लाख १४ हजार ८३५ मताधिक्क्याने विजय मिळवला होता. त्याआधी विक्रमी मतधिक्याचा विक्रम अजित पवार यांच्या नावावर होता. त्यांनी बारामतीतून १ लाख ६५ हजार मताधिक्क्याने विजय मिळवला होता. हा निकाल सुनेत्रा पवार यांच्यासाठी ऐतिहासिक ठरला. त्यांनी अखेरच्या २४ व्या फेरीतही विक्रमी ▶▶ पान २ वर

### राहुरीत अक्षय कर्डिले यांचा विजय

राहुरी विधानसभा पोटनिवडणुकीत भाजपचे उमेदवार अक्षय कर्डिले एक लाखाहून मताधिक्क्यासह विजयी झाले आहेत. अक्षय कार्डिले यांनी राहुरीत मिळालेला हा विजय त्यांच्या वडिलाना समर्पित केला आहे. ही निवडणूक नव्हती, ही एक भावना होती, अशी प्रतिक्रिया त्यांनी विजयानंतर व्यक्त केली. भाजपचे दिवंगत नेते तथा आमदार शिवाजीराव कर्डिले यांच्या निधनानंतर राहुरी विधानसभेची जागा रिक्त झाली होती. या जागेसाठी पोटनिवडणूक घेण्यात आली.

# शशी थरुर होणार केरळचे मुख्यमंत्री?

## काँग्रेस खेळणार मोठा डाव



नवी दिल्ली । वृतसंस्था

केरळ विधानसभा निवडणुकीत काँग्रेसच्या नेतृत्वाखाली संयुक्त लोकशाही आघाडी (यूडीएफ) चा विजय झाला. तर दशकभरापासून सत्तेत असलेल्या डाव्या लोकशाही आघाडी (एलडीएफ) ला पराभवाचा सामना करावा लागला. या निकालाने देशाच्या सत्ताकारणातून डावे पक्ष बाद झाल्याचे स्पष्ट झाले.

केरळ हे देशातील एकमेव राज्य होते, जिथे डाव्या पक्षांचे सरकार होते. मात्र, आता ते देखील ▶▶ पान २ वर

# प.बंगालमध्ये भाजपाचा ऐतिहासीक विजय; ममतांचा गड उद्ध्वस्त !

कोलकाता । वृत्तसंस्था

**पश्चिम बंगाल विधानसभा निवडणुकीमध्ये राजकीय समीकरणांमध्ये मोठा बदल पाहायला मिळत आहे. अनेक वर्षे सत्तेत असलेल्या तृणमूल काँग्रेसला पराभूत करत भाजपने जोरदार मुसंडी मारली आहे. निवडणुकीच्या प्रचारापासून ते मतदानापर्यंत भाजपाने आखलेली रणनीती आणि मतदारांमध्ये झालेला बदल यामुळे ही लढत अधिक चुरशीची ठरली.**


भाजपची अनेक वर्षांची रणनीती आणि केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांसह अनेक नेते बंगालमध्ये तळ ठोकून होते. तसेच या विजयाचे मोठे श्रेय शुभेंदु अधिकारींनाही जाते. पक्षाचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी पंतप्रधान मोदी आणि गृहमंत्री अमित शाह यांसारखे दिग्गज नेते सक्रिय होतेच. पण बंगालमध्ये प्रत्यक्ष जमिनीवर उतरून पक्षासाठी वातावरण तयार करण्यात शुभेंदु अधिकारी यांची भूमिका सर्वात महत्त्वाची ठरली. भाजपाने राज्यात आपली संघटनात्मक ताकद वाढवण्यासाठी मोठे बदल केले. स्थानिक पातळीवर नेतृत्व विकसित करत पक्षाने शहरी आणि ▶▶ पान २ वर




### आसाममध्ये पुन्हा 'हिंमत राज'

आसाम विधानसभा निवडणुकांचा निकाला आता हाती आला असून, भाजपच्या विजय अश्वाची घोडदौड कायम असल्याचे चित्र आहे. पहिल्या कलापासून ते शेवटच्या कलापर्यंत भाजपने जोरदार मुसंडी मारली. आसाममध्ये पुन्हा 'हिंमत राज' असल्याचे निश्चित झाले आहे. भाजपने ९५ जागा मिळविल्या असून आघाडी घेत सत्तास्थापनेच्या दिशेने वाटचाल सुरु केली होती. तर काँग्रेसला २९ जागांवर समाधान मानावे लागले आहे. तर इतर २ जागांवर अपक्ष आहेत. दरम्यान, भाजपने गेल्या निवडणुकीच्या तुलनेत यावेळी ३० हून अधिक जागा मिळत आसाममध्ये पक्षाची ताकद वाढवली आहे.

### पुदुच्चेरीत पुन्हा रंगास्वामी; भाजप–एनडीएचा दणदणीत विजय!



पुदुच्चेरी विधानसभा निवडणुकीत भाजपप्रणित एनडीएने पुन्हा एकदा दणदणीत विजय मिळवला. यंदाच्या निवडणुकीत इथे पुन्हा सत्ता मिळवणे हा केवळ राजकीय योगायोग नसून विविध घटकांच्या एकत्रीकरणातून आलेले परिणाम आहेत. भाजपची एआयएनआरसी सोबत युती पुन्हा एकदा मजबुतीने पुढे आली आहे. विद्यमान मुख्यमंत्री एन. रंगास्वामी यांची स्थानिक पातळीवरील विश्वासार्ह प्रतिमा, साधी शैली आणि जनसंपर्क यामुळे मतदारांमध्ये त्यांच्याबद्दल सकारात्मक भावना होती तर भाजपने संघटनात्मक पातळीवर प्रभावी प्रचार यंत्रणा उभी केली. स्थानिक नेतृत्वाला राष्ट्रीय पाठबळ दिले. पुदुच्चेरी केंद्रशासित प्रदेश असल्यामुळे केंद्रातील सत्ताधारी पक्षाशी सुसंगत सरकार असेल तर अधिक निधी, विकास प्रकल्प आणि पायाभूत सुविधा मिळतील, असा विचार मतदारांमध्ये पेरण्यात एनडीएला यश आले.

### तामिळनाडूवर विजय राज



अभिनेते विजय यांच्या तामिळगा वेत्री कळघम पक्षाला तामिळनाडू विधानसभा निवडणुकीत अभूतपूर्व यश मिळाले आहे. तब्बल पाच दशकांच्या दोन अक्षांमध्ये विभागल्या गेलेल्या द्रविडी राजकारणाचे चक्र भेदले गेले आहे. तामिळनाडूचा निकाल हा केवळ प्रस्थापितविरोधी नाही, तर त्याच-त्याच चेहऱ्यांना कंटाळलेल्या जनतेचा हा कौल आहे. तेच डीएमके, एआयएडीएमके पक्ष आणि तेच-तेच चेहरे नाकारून तमिळनाडूच्या मतदारांनी ताज्या दमाच्या नेत्याचा, ताज्या दमाचा पक्ष सत्तेजवळ नेऊन ठेवला आहे. पहिल्याच फटक्यात तामिळी राजकारणातल्या धुरंधर नेत्यांना चारी मुंड्या चित केले आहे. प्रस्थापित नेत्यांवर सातत्याने होणारे भ्रष्टाचाराचे आरोप आणि विजय यांची कोरी राजकीय पाटी हे समीकरण जुळून आल्याने तामिळनाडूत हा चमत्कार बघायला मिळाला.

## थोडक्यात...

### पत्नीचा जाच न्यायाधीशांनी केली आत्महत्या

दिल्ली: दिल्लीत कार्यरत असलेले न्यायाधीश आणि अलवरचे रहिवासी असलेले अमन शर्मा यांनी २ मे रोजी आत्महत्या केली. त्यांचे पार्थिव अलवरला आणण्यात आले, जिथे रविवारी त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांचे वडील, वकील प्रेम कुमार शर्मा यांनी चिता पेटवली. कुटुंबीयांच्या म्हणण्यानुसार, पत्नीने वडिलांचा अपमान केल्यामुळे अमन खूप अस्वस्थ झाला होता. त्यांनी सांगितले की, तो हा अपमान सहन करू शकला नाही आणि त्याने हे टोकाचे पाऊल उचलले. त्याने बाथरूममधील स्टूल आणि शाल वापरून आपल्या खोलीत गळफास घेतला. मृत्यूच्या दोन दिवस आधी, अमनने वडिलांना फोन करून सांगितले की, त्याला आता जगायचे नाही, आणि तो त्याचा शेवटचा कॉल होता.

### इंदोर येथे देशांच्या कृषिमंत्र्यांची बैठक

इंदोर: भारताच्या अध्यक्षतेखाली ब्रिक्स देशांच्या कृषिमंत्र्यांची दोन दिवसीय बैठक आयोजित करण्यात येणार आहे. या बैठकीचा आढावा केंद्रीय कृषिमंत्री शिवराजसिंग चौहान आणि मध्य प्रदेशचे मुख्यमंत्री मोहन यादव यांनी नुकताच घेतला. जून महिन्यात मध्य प्रदेशमधील इंदोर येथे १२ ते १३ जून या दरम्यान बैठक होणार असून अन्नसुरक्षा, स्मार्ट शेती, जागतिक कृषी व्यापार आणि शेतकरी कल्याण यांसारख्या महत्त्वाच्या विषयांवर चर्चा केली जाणार आहे. पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखाली होणारी ही बैठक जागतिक कृषी क्षेत्रासाठी एक ऐतिहासिक संधी ठरेल. ती जगाला एक नवी दिशा देईल, असे चौहान म्हणाले. या बैठकीपूर्वी ९ ते ११ जून दरम्यान ब्रिक्स कृषी कार्यगटाच्या अधिकाऱ्यांची तीन दिवसीय बैठक आयोजित करण्यात आली आहे.

### दलितांकडूनच का साफ करून घेता–सरन्यायाधीशं

नवी दिल्ली: ओरिसातील विविध न्यायालयांनी आरोपींना जामीन देण्याच्या बदल्यात पोलीस स्टेशनची साफसफाई करण्याची अट घातल्याबद्दल सर्वोच्च न्यायालयाने सोमवारी तीव्र संताप व्यक्त केला आहे. या प्रकरणातील आरोपी प्रामुख्याने दलित आणि आदिवासी समाजातील आहेत. सर्वोच्च न्यायालयाने असे सर्व वादग्रस्त आदेश तातडीने रद्द केले आहेत. सरन्यायाधीश सूर्यकांत आणि न्यायमूर्ती जॉयमाल्या बागची यांच्या खंडपीठाने या अटींना मानवी हक्कांचे उल्लंघन आणि व्यक्तीच्या प्रतिष्ठेवर केलेला थेट हल्ला म्हटले आहे. सर्वोच्च न्यायालयाने माध्यमातील रिपोर्ट्सच्या आधारे या प्रकरणाची स्वतःहून दखल घेतली होती. अनेक मीडिया रिपोर्ट्समध्ये खुलासा झाला होता की, ओरिसातील अनेक कनिष्ठ न्यायालये आणि स्वतः ओरिसा उच्च न्यायालय जामीन देताना विचित्र अटी घालत आहेत.

## बाजारभाव

कृषि उत्पन्न बाजार समिती, बीड, दि.०४ मे २०२६

आवक क्विंटलमध्ये तर भाव प्रतिक्विंटलचे आहेत

| शेतमाल (आवक) | किमान | कमाल | सरासरी |
|---|---|---|---|
| गहू: २१४.५० क्विंटल | २,१५० | २,५४५ | २,३३० |
| ज्वारी/हायब्रिड: २१२.०० क्विंटल | १,७०० | ३,७५३ | २,३०९ |
| मका/लोकल: ३.५० क्विंटल | १,५०० | १,५०० | १,५०० |
| तूर : ५.०० क्विंटल | ६,००० | ६,५०१ | ६,२५० |
| उडीद : ६.५० क्विंटल | ६,१०० | ६,१०० | ६,१०० |
| बाजरी: ९९.५० क्विंटल | २,१०० | २,४०२ | २,२३१ |
| मुग: २.०० क्विंटल | ७,८०० | ७,८०० | ७,८०० |
| सोयाबीन: २०.०० क्विंटल | ५,६२५ | ५,६२५ | ५,६२५ |
| हरभरा: ७.०० क्विंटल | ५,०५३ | ५,१२५ | ५,०९३ |

# एसपी तेगबीर सिंह संधू यांनी श्रीक्षेत्र राजूर गणपतीचे दर्शन घेऊन स्वीकारला पदभार

शिवाजी मस्के । जालना

**जालना जिल्ह्याचे नवनियुक्त पोलीस अधीक्षक तेगबीर सिंह संधू यांनी रविवारी श्रीक्षेत्र राजूर गणपतीचे दर्शन घेऊन आपल्या कार्याची सुरुवात केली. दर्शनानंतर त्यांनी अधिकृतरीत्या जालना जिल्हा पोलीस अधीक्षक पदाचा पदभार स्वीकारला. यावेळी पोलीस दलाच्या वतीने त्यांचे स्वागत करण्यात आले.**



पदभार स्वीकारल्यानंतर प्रसारमाध्यमांशी संवाद साधताना संधू यांनी जालन्यातील नागरिकांना विश्वास दिला की, जिल्ह्यातील जनतेला उत्तम आणि तत्पर पोलीस सेवा देण्यासाठी ते सदैव कटिबद्ध राहतील. नागरिकांच्या सुरक्षेसाठी व सेवेसाठी आवश्यक ते सर्व प्रयत्न केले जातील, असे त्यांनी स्पष्ट केले. यापूर्वी मालेगाव येथे अप्पर पोलीस अधीक्षक म्हणून कार्यरत असलेल्या संधू यांना प्रशासकीय कामाचा अनुभवाचा मोठा अनुभव आहे. त्यांच्या या अनुभवाचा जालना जिल्ह्याला कितपत फायदा होतो, याकडे आता सर्वांचे लक्ष लागले आहे. पोलिस अधीक्षक तेगबीर सिंह संधू हे २०१८ बॅचचे आयपीएस अधिकारी आहे संधू हे भारतीय पोलीस सेवेतील २०१८ बॅचचे अधिकारी आहेत. तेगबीर सिंह संधू हे ▶▶ पान २ वर

# पगारवाढ करण्यात भारत जगात आघाडीवर

## कर्मचारी गळतीचा दर १६.२ टक्केपर्यंत कमी, सॅलरी ग्रोथ अँड टर्नओव्हर सर्व्हेतून मिळाली माहिती

मुंबई । प्रतिनिधी

जागतिक वेतनवाढीच्या आलेखात भारत आघाडीवर आहे. २०२६ पर्यंत वेतनवाढ सरासरी ९.१ पर्यंत पोहोचण्याचा अंदाज आहे. जी २०२५ मधील ८.९ टक्के पेक्षा किंचित जास्त आहे. एऑनच्या सॅलरी ग्रोथ अँड टर्नओव्हर सर्व्हे २०२५-२६ नुसार, ही वाढ अमेरिका ४.३ टक्के आणि युके (४.१ टक्के) सारख्या विकसित देशांपेक्षा लक्षणीयरीत्या जास्त आहे.

अहवालात म्हटले आहे की, वाढलेल्या देशांतर्गत मागणीमुळे रिअल इस्टेट, पायाभूत सुविधा आणि वित्तीय सेवा (एनबीएफसी) यांसारख्या क्षेत्रांमध्ये सर्वाधिक वेतनवाढ होत आहे. कर्मचारी गळतीचा दर १६.२ टक्केपर्यंत कमी झाला आहे, जो गेल्या वर्षीच्या तुलनेत घटलेला आहे. तज्ज्ञांच्या मते, कनिष्ठ कर्मचाऱ्यांना सर्वाधिक सरासरी ९.६ टक्के वेतनवाढ मिळत आहे. तज्ज्ञांचे म्हणणे आहे की, कंपन्या चांगल्या कर्मचाऱ्यांना, विशेषतः कनिष्ठ आणि ▶▶ पान २ वर



## अग्रलेख

# ‘सुन्न समाज, बेधडक गुन्हेगार : आता तरी जागा होईल का राजधर्म?’

पुणे जिल्ह्याच्या मातीत आणि महाराष्ट्राच्या पुरोगामी परंपरेत अवघ्या काही तासांच्या अंतराने घडलेल्या तीन घटनांनी केवळ कायदा-सुव्यवस्थेचा प्रश्न निर्माण केला नाही, तर समाजाच्या आत्म्यालाच हादरवून सोडले आहे. नसरापूरमध्ये एका ६५ वर्षीय नराधमाने चार वर्षांच्या चिमुरडीवर केलेला अत्याचार आणि तिची दगडाने ठेचून केलेली हत्या, चाकणमध्ये तीन वर्षांच्या निष्पाप बालकावर शेजाऱ्यानेच केलेले अनैसर्गिक कृत्य आणि त्याचा निर्घृण खून, तसेच बीड जिल्ह्यात अंगाखांद्यावर खेळवणाऱ्या आजोबानेच तीन वर्षांच्या नातीवर केलेला लैंगिक अत्याचारया घटना केवळ गुन्हे नाहीत; त्या आपल्या सामूहिक अपयशाचे जिवंत पुरावे आहेत.

या घटना वाचताना मन सुन्न होते, पण त्याहून भयंकर गोष्ट म्हणजे या सुन्नतेची सवय होऊ लागली आहे. एकेकाळी समाजसुधारणेच्या विचारांनी देशाला दिशा देणारा महाराष्ट्र आज अशा विकृत मानसिकतेच्या विळख्यात कसा सापडला, हा प्रश्न प्रत्येक सजग नागरिकाने स्वतःला विचारण्याची वेळ आली आहे. आपण केवळ बातम्या वाचतो, संताप व्यक्त करतो, सोशल मीडियावर प्रतिक्रिया देतो आणि काही दिवसांनी सर्व काही विसरतोहीच गुन्हेगारांसाठी सर्वात मोठी मोकळीक ठरते. आज शासनाच्या पातळीवर विविध योजनांचा गजर सुरू आहेलाडकी बहीण, लाडका मुलगा, महिलांच्या सक्षमीकरणाच्या घोषणा. कागदोपत्री हे चित्र अत्यंत आकर्षक दिसते; पण वास्तवात आपल्या मुलांचे, विशेषतः बालकांचे, आयुष्य किती सुरक्षित आहे? जाहिरातींच्या झगमगाटात मूलभूत प्रश्न झाकोळले जात आहेत. सुरक्षा ही कोणतीही योजना नसते, ती राज्यकर्त्यांची प्राथमिक जबाबदारी असते. आणि नेमकी तिथेच आपण अपयशी ठरत आहोत. अशा घटनांनंतर दिसणारे राजकीय चित्र अधिक वेदनादायक आहे. सत्ताधारी आणि विरोधक दोघेही रस्त्यावर उतरून आंदोलने करतात, निषेध व्यक्त करतात, कठोर शिक्षेची मागणी करतात. पण हा विरोध कोणाविरुद्ध? जर सत्तेत असलेलेच लोक आंदोलक बनत असतील, तर ते त्यांच्या स्वतःच्या अपयशाची कबुलीच नाही का? न्याय मिळवून देण्याची जबाबदारी ज्यांच्यावर आहे, तेच जर घोषणाबाजी करण्यात व्यस्त असतील, तर सामान्य नागरिकाने कोणाकडे पाहायचे? नसरापूरच्या पीडित बालिकेच्या पित्याने घेतलेली ठाम भूमिका‘‘न्याय मिळेपर्यंत कोणत्याही नेत्याने आमच्या उंबरठ्यावर येऊ नये’’ही केवळ एका दु:खी बापाची हाक नाही, तर संपूर्ण राजकीय व्यवस्थेला दिलेला आरसा आहे. दु:खाच्या क्षणी फोटो काढण्यासाठी, सांत्वनाच्या नावाखाली उपस्थिती दाखवण्यासाठी धाव घेणाऱ्या नेत्यांनी आता आत्मपरीक्षण करणे आवश्यक आहे. पीडितांच्या जखमांवर शब्दांचे मलम लावण्यापेक्षा न्यायाच्या प्रक्रियेला गती देणे अधिक महत्त्वाचे आहे.ङ्गया घटनांमागे केवळ वैयक्तिक विकृती नाही, तर व्यवस्थेतील त्रुटीही तितक्याच जबाबदार आहेत. अनेक वेळा आरोपी पूर्वीच्या गंभीर गुन्ह्यांतून पुराव्याअभावी सुटलेले असतात. तपासातील त्रुटी, साक्षीदारांचे संरक्षण न होणे, न्यायालयीन प्रक्रियेतील विलंबया सर्व गोष्टी गुन्हेगारांना निर्भय बनवतात. ‘‘कायदा काही करू शकत नाही’’ ही भावना जेव्हा त्यांच्या मनात घट्ट बसते, तेव्हा ते अधिक क्रूर होतात. म्हणूनच, केवळ कठोर शिक्षेची मागणी करून भागणार नाही. शिक्षा निश्चितच कठोर, वेगवान आणि उदाहरणीय असली पाहिजे; पण त्याचबरोबर तपास यंत्रणा सक्षम करणे, न्यायालयीन प्रक्रिया गतिमान करणे आणि साक्षीदार संरक्षण यंत्रणा मजबूत करणे तितकेच गरजेचे आहे. ‘फास्ट ट्रॅक कोर्ट’ ही केवळ घोषणा न राहता ती प्रत्यक्षात परिणामकारक ठरली पाहिजे. अन्यथा, ती केवळ जनतेच्या संतापावर पाणी टाकण्याचे साधन ठरेल. समाजाच्या पातळीवरही आत्मपरीक्षण अपरिहार्य आहे. लैंगिक विकृतीची ही वाढती प्रवृत्ती केवळ कायद्याने थांबणार नाही. कुटुंब, शिक्षणव्यवस्था आणि सामाजिक मूल्ये यांच्यातील ढासळणारी भिंत पुन्हा उभी करावी लागेल. मुलांना सुरक्षिततेचे, संवेदनशीलतेचे आणि सन्मानाचे धडे देणे ही केवळ शाळांची नव्हे, तर प्रत्येक घराची जबाबदारी आहे. समाज म्हणून आपण अधिक सजग, जागरूक आणि उत्तरदायी बनलो नाही, तर अशा घटना पुन्हा घडत राहतील. आज गरज आहे ती केवळ निषेधाची नाही, तर निर्णायक कृतीची. राजकीय पक्षांनी आरोप-प्रत्यारोपांच्या पलीकडे जाऊन एकमताने अशी व्यवस्था उभी करावी की, अशा पाशवी गुन्ह्यांसाठी ‘जेल की फाशी’ याशिवाय कोणताही पर्याय उरणार नाही. कायद्याचा धाक पुन्हा निर्माण करणे ही काळाची गरज आहे. समाजमन आज सुन्न झाले आहे; पण ही सुन्नता धोकादायक आहे. ती संतापात, आणि तो संताप कृतीत परिवर्तित झाला पाहिजे. अन्यथा, ‘‘बाळांनो, आम्हाला माफ करा’’ हे शब्द वारंवार उच्चारण्याची वेळ आपल्यावर येतच राहील. आता परीक्षा योजनांची नाही, तर राजधर्माची आहे. सत्तेत बसलेल्यांनी जर हा राजधर्म पाळला नाही, तर इतिहास त्यांना कधीच माफ करणार नाही. आणि आपणही नाही.

# बीड पोलिसांचे माणुसकीचे दर्शन: रस्त्यावर भटकणाऱ्या असहाय्य मातेला अन् चिमुरड्यांना मिळाला आधार




> ‘पोलीस दल हे केवळ कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी नसून, समाजातील शेवटच्या घटकाला सुरक्षा प्रदान करण्यासाठी सदैव तत्पर असते. सदर महिलेला सुरक्षित वातावरणात पोहोचवणे हे आमचे कर्तव्य होते.
>
> –दिलीप खेडकर
> (सपोनि, जिल्हा वाहतूक शाखा, बीड)

बीड । प्रतिनिधी

**बीड शहर वाहतूक शाखेच्या सतर्कतेमुळे आणि संवेदनशीलतेमुळे सोमवारी (दि. ४ मे) एका असहाय्य महिलेसह तिच्या दोन चिमुरड्या मुलींना सुरक्षित आधार मिळाला आहे. घरगुती वादातून रस्ता हरवलेल्या या कुटुंबाला पोलिसांनी केवळ सुरक्षित निवाराच मिळवून दिला नाही, तर त्यांच्या कायदेशीर संरक्षणाची जबाबदारीही स्वीकारली आहे.**

सोमवारी दुपारी जालना जिल्ह्यातील रहिवासी असलेल्या २८ वर्षीय महिला (नाव बदलले आहे) आपल्या ५ आणि २ वर्षांच्या दोन लहान मुलींसह बीड शहरातील रस्त्यांवर अत्यंत चिंताग्रस्त अवस्थेत फिरत होत्या. कडक उन्हात या महिलेला दोन लहान मुलांसह व्याकुळ अवस्थेत फिरताना वाहतूक शाखेचे पोलीस अंमलदार सखाराम घोलप, वसिम शेख आणि दत्ता कदम यांनी पाहिले. संशय आल्याने त्यांनी तात्काळ विचारपूस केली असता, कौटुंबिक त्रासामुळे घर सोडून आल्याचे व निवाऱ्याच्या शोधात असल्याचे महिलेने सांगितले. घटनेचे गांभीर्य ओळखून अंमलदारांनी तात्काळ वाहतूक शाखेचे प्रभारी अधिकारी सपोनि दिलीप कुमार खेडकर यांना माहिती दिली. खेडकर यांनी क्षणाचाही विलंब न लावता घटनास्थळी धाव घेतली. असुरक्षित परिस्थितीत असलेल्या या महिलेसोबत कोणताही अनुचित प्रकार घडू नये, या सामाजिक जाणिवेपोटी खेडकर यांनी त्यांना सन्मानाने पोलीस वाहनात बसवून ’जिव्हाळा बेघर निवारा केंद्र’ येथे नेले. निवारा केंद्राच्या संचालकांशी चर्चा करून महिला व मुलांच्या राहण्याची व भोजनाची व्यवस्था करण्यात आली आहे. या प्रकरणाची सविस्तर माहिती बीड शहर पोलीस स्टेशनला लेखी स्वरूपात देण्यात आली असून, जालना जिल्ह्यातील पोलीस ठाण्यांशी संपर्क साधून महिलेला कायदेशीर न्याय मिळवून देण्यासाठी प्रयत्न सुरू आहेत.

# पाणीटंचाई, शेतकऱ्यांच्या प्रश्नांसंदर्भात घेतली आ.संदिप क्षीरसागरांनी आढावा बैठक

## उन्हाळ्याच्या काळात पाणीटंचाई भासू नये यासाठी नियोजन करण्याच्या दिल्या प्रशासनाला सुचना

बीड । प्रतिनिधी

**उन्हाळ्याच्या काळात नागरिकांसमोर पाणीटंचाई सारखे संकट उभे राहू नये. त्या संदर्भात नियोजन करून तातडीने पाणीटंचाईच्या अनुषंगाने उपाययोजना कराव्यात अशा सुचना आ.संदिप क्षीरसागर यांनी प्रशासनाला केल्या आहेत. उन्हाळ्यात पाणीटंचाईच्या आणि पीक विम्याच्या अनुषंगाने आ.संदिप क्षीरसागर यांनी आढावा बैठक घेतली. या बैठकी दरम्यान त्यांनी संबंधित अधिकाऱ्यांना सुचना दिल्या आहेत.**

सोमवार (दि.४) रोजी पाणी टंचाई आणि शेतकऱ्यांच्या विविध समस्या यांच्या अनुषंगाने आ.संदिप क्षीरसागर यांनी शासकीय विश्रामगृह बीड येथे पंचायत समिती, कृषी विभाग आणि इतर विभागांची आढावा बैठक घेतली. या बैठकीत बीड मतदारसंघातील बीड व शिरूर (का.) तालुक्यातील ग्रामीण भागामध्ये पाणी टंचाई सारखी भीषण समस्या निर्माण होऊ नये यासाठी टँकरने पाणी पुरवठा, जलस्त्रोत अधिग्रहण आणि इतर उपाययोजना करण्या संदर्भात विस्तृत चर्चा करण्यात आली.



> **आवश्यक असलेल्या गावांमध्ये टँकर मागणीसाठी प्रस्ताव सादर करा– आ.संदिप क्षीरसागर**
>
> बीड विधानसभा मतदारसंघातील बीड व शिरूर का. तालुक्यातील ग्रामीण भागामध्ये उन्हाळ्यातील होणाया पाणी टंचाई साठी आवश्यक असलेल्या गावांनी ग्रामपंचायतीचा ठराव घेवून टँकर मागणीचे प्रस्ताव आपल्या पंचायत समितीकडे सादर करावेत, असे आवाहन आ.संदिप क्षीरसागर यांनी केले आहे.

पाणी टंचाईला होऊ नये यासाठी प्रशासनाने लवकरात लवकर नियोजन करून उपाय योजनांची अंमलबजावणी तात्काळ करावी, अशा सुचना आ.क्षीरसागर यांनी दिल्या. तसेच, पीक विमा, पी.एम.किसान योजना तसेच शेतकऱ्यांसाठी शासनाकडून राबविण्यात येणाऱ्या विविध योजना आणि शेतकयांच्या दृष्टीने त्यामध्ये असलेल्या अडचणी या बाबत देखील यावेळी आ.क्षीरसागर यांनी कृषी विभागाच्या अधिकायांकडून आढावा घेवून आवश्यक त्या सुचना केल्या. या बैठकीस माजी आ.सय्यद सलीम, बीड पंचायत समिती, शिरूर (का.) पंचायत समिती, कृषी विभाग येथील संबंधित अधिकारी यांची उपस्थिती होती.



बीड : पंचायत समितीचे नूतन गटशिक्षणाधिकारी म्हणून भगवान सोनवणे यांनी मंगळवार दिनांक ४ एप्रिल रोजी पदभार स्वीकारला. यावेळी अधिकारी, कर्मचारी, शिक्षक यांनी त्यांचे स्वागत केले. याप्रसंगी शिक्षण विस्तार अधिकारी सेवानिवृत्त शिक्षण विस्तार अधिकारी, सिद्धेश्वर माटे, गौतम चोपडे, शिक्षक नेते अंकुश निर्मळ,बहुजन शिक्षक संघटनेचे विभागीय अध्यक्ष बबनराव पंडित, राज्य सचिव विनोद कुमार कांबळे, शिक्षक भारती तालुका अध्यक्ष उद्धव खरात, मुकुंद खांडे, नामदेव फुलझळके, शिक्षक तथा निवेदक- सूत्रसंचालक महादेव इनकर आदींची उपस्थिती होती.

# श्री क्षेत्र बेलेश्वर संस्थान येथे ईश्वरबाबा भारती जन्मोत्सव सोहळा उत्साहात

## दोन दिवस विविध धार्मिक कार्यक्रम संपन्न

गेवराई । प्रतिनिधी

**श्री क्षेत्र ईश्वर बाबा भारती बेलेश्वर संस्थान, बेलगाव येथे समाधीस्थ असलेले महान सिद्ध साधू श्री गुरु ईश्वर भारती महाराज याच्या १७० व्या जयंतीनिमित्त ५२ वा जन्मोत्सव सोहळा व दोन दिवसीय कीर्तन महोत्सव मोठ्या उत्साहात आणि भक्तिमय वातावरणात संपन्न झाला. या महोत्सवात पंचक्रोशीतील भाविक भक्तांनी दर्शनासाठी अलोट गर्दी केली होती.**

महान सिद्ध साधू श्री गुरु ईश्वर भारती महाराज यांच्या १७० व्या जयंतीनिमित्त ५२ व्या जन्मोत्सव सोहळ्यात दोन दिवशीय कीर्तन महोत्सवाचा शनिवार, दि.२ मे रोजी कलश पूजनाने झाला. महोत्सवाच्या पहिल्या दिवशी रात्री ह.भ.प.प्रा. त्र्यंबक महाराज मातकर (वरवटी) यांची सुश्राव्य कीर्तन सेवा पार पडली. यावेळी आपल्या कीर्तनातून त्यांनी संतांच्या कार्याचा गौरव केला. या प्रसंगी जिल्हा परिषदेचे माजी उपाध्यक्ष श्री. राजेंद्र मस्के, भाजपा युवा नेते शरद बडगे उपस्थित होते. दुसऱ्या दिवशी रविवार,दि. ३ मे रोजी कीर्तनकेसरी ह.भ.प.दयानंद महाराज कोरेगावकर यांचे अमृततुल्य ’काल्याचे कीर्तन’ संपन्न झाले. आपल्या ओघवत्या वाणीतून महाराजांनी उपस्थितांना मंत्रमुग्ध केले.कीर्तनानंतर महाप्रसादाचे वाटप करण्यात आले. या मंगल प्रसंगी श्रीक्षेत्र बेलेश्वर संस्थानचे मठाधिपती ह.भ.प.महंत महादेव भारती महाराज,ह.भ.प. शांतिब्रह्म तुकाराम भारती महाराज यांचे आयोजकांच्या वतीने पुष्पहार घालून पूजन करुन आशीर्वाद घेतले. या भव्य कार्यक्रमाचे आयोजन विनोद मनोहर शेळके, गणेश मनोहर शेळके व समस्त



शेळके पाटील परिवाराच्या वतीने करण्यात आले होते. या महोत्सवाला बेलगाव, वाघीरा, पोखरी, बेलखंडी, देवाच्यावाडी, पिंपरनई, सोमनाथवाडी, मुळूक, लिंबागणेश यांसह पंचक्रोशीतील महिला व पुरुष भाविक, वारकरी, महिला भजनी मंडळ आणि भक्तगण मंडळी मोठ्या संख्येने उपस्थित होते. मार्गदर्शक मातोश्री पार्वती मनोहर शेळके, उत्तमराव आससोडे, बबनराव मंठारीकर यांच्यासह ग्रामस्थांनी व युवा कार्यकर्त्यांनी सोहळ्याच्या यशस्वीतेसाठी विशेष परिश्रम घेतले.

## पान १ वरून...

### महिनाभरात कर्जमाफीचा

तरुणांना रोजगाराची संधी उपलब्ध करून देण्यासाठी शेतकरी मित्र योजना सुरू करण्यात येत आहे. या योजनेअंतर्गत संपूर्ण राज्यात ११ हजार शेतकरी मित्रांची नियुक्ती केली जाईल. जिल्हास्तरावर निवड प्रक्रिया पार पाडून या नियुक्त्या केल्या जातील. या माध्यमातून ग्रामीण भागातील सुशिक्षित बेरोजगार तरुणांना हक्काचा रोजगार मिळेल आणि शेतकऱ्यांना सरकारी योजनांची माहिती वेळेत उपलब्ध होईल.

---------

### शशी थरुर होणार

त्यांच्या हातातून गेले. दुसरीकडे, केरळममध्ये आतापर्यंत एलडीएफ आणि यूडीएफने आलटून-पालटून सत्ता राखल्याचा पॅटर्न राहिला. मात्र, यावेळेस हे चित्र बदलणार आणि निवडणूक भाजपमुळे तिहेरी होणार, असे बोलले गेले. प्रत्यक्षात, निवडणूक दुहेरी झाली आणि भाजपला विशेष अशी कामगिरी करता आली नाही. राज्यात एलडीएफ सलग दशकभर सत्तेत राहिली. यामुळे मुख्यमंत्री पी. विजयन यांच्या सरकारच्या विरोधात सत्ताविरोधी लाट असणे स्वाभाविक होते. राज्यातील विरोधी पक्षनेते व्ही. डी. सतीशन हे सरकारचे प्रखर टीकाकार म्हणून पुढे आले. प्रचारादरम्यान त्यांनी सरकारवर जोरदार टीका केली. राहुल गांधींसह पक्षाच्या केंद्रीय नेतृत्वाने राज्यात मोठी ताकद लावली. पी. विजयन यांनी भाजपसोबत मिलीभगत केल्याचा आरोप काँग्रेस आघाडीने केला. याअगोदर काँग्रेसने विधानसभेत आकडेवारी आणि पुराव्यांसह सरकारच्या धोरणांवर प्रश्नचिन्ह उपस्थित करत नागरिकांमध्ये सत्ताधाऱ्यांचा भ्रष्टाचार मांडण्याचा प्रयत्न केला. काँग्रेसचा मित्रपक्ष असलेल्या इंडियन युनियन मुस्लिम लीगने उत्तर केरळमध्ये, विशेषतः मलबार प्रदेशात आपले अस्तित्व अधिक मजबूत केले. यूडीएफने केरळमधील अल्पसंख्याक समुदायांमध्ये पुन्हा विश्वास संपादन केला. २०२१ मध्ये डाव्यांना पाठिंबा देणाऱ्या चर्चमधील काही गट पुन्हा यूडीएफसोबत आलेले दिसले.

-------------

### बारामतीत सुनेत्रा पवारांचा

मताधिक्य मिळविले. मतमोजणीच्या सर्व फेऱ्यांमध्ये सुनेत्रा पवारांची मतांची आघाडी कायम राहिली. २३ व्या फेरीअखेर त्या २ लाख १४ हजार ५९ मते घेऊन आघाडीवर होत्या. अखेरच्या २४ व्या फेरीअखेर निकालाचे चित्र स्पष्ट झाले. हा विजय दादांना वाहिलेली आदरांजली आहे, अशा शब्दांत सुनेत्रा पवार यांनी विजयानंतर आपल्या भावना व्यक्त केल्या. बारामती विधानसभा पोटनिवडणुकीत मला भरघोस मतांनी विजयी केल्याबद्दल तमाम मायबाप बारामतीकरांचे मनःपूर्वक आभार. आपण दाखवलेला विश्वास, प्रेम आणि पाठिंबा माझ्यासाठी अत्यंत मोलाचा आहे, असे त्यांनी एक्सवरील पोस्टमध्ये म्हटले आहे. आज बारामती विधानसभा पोटनिवडणुकीचा निकाल जाहीर होत असताना आपण सर्वांनी आपल्या मतांमधून दाखवलेला विश्वास मी आदरणीय अजितदादांच्या पवित्र स्मृतींना समर्पित करते. आजचा हा निकाल जाहीर होत असताना दादांच्या आठवणींना उजाळा मिळाल्याने आपण सर्वजण भावूक आहोत. दादांवर जीवापाड प्रेम करणाऱ्या सर्व कार्यकर्त्यांना नम्र विनंती आहे की, या विजयाचा जल्लोष म्हणून कुणीही मिरवणुका काढू नयेत किंवा गुलाल उधळू नये. आपण संयम राखूया आणि दादांच्या विचारांना साजेसं वर्तन करूया, असे त्या म्हणाल्या.

-------------

### प.बंगालमध्ये भाजपाचा ऐतिहासीक

ग्रामीण दोन्ही मतदारांपर्यंत पोहोच वाढवली. बूथ लेव्हलवरील मजबूत नेटवर्कमुळे प्रत्येक मतदाराशी थेट संपर्क साधण्यात यश आले.

----------

### पगारवाढ करण्यात भारत

नवीन कर्मचाऱ्यांना, नोकरी सोडून जाण्यापासून रोखण्यासाठी त्यांना टिकवून ठेवण्यावर अधिक लक्ष केंद्रित करत आहेत. एऑनचे पार्टनर आणि रिवॉर्ड्स कन्सल्टिंग लीडर (टॅलेंट सोल्युशन्स, इंडिया) रुपंक चौधरी म्हणाले की, सध्या सुरू असलेल्या जागतिक अस्थिरतेनंतरही भारताची देशांतर्गत अर्थव्यवस्था खूप मजबूत आहे, त्यामुळे भारतातील नोकऱ्यांचे मूल्यांकन इतर मोठ्या देशांपेक्षा खूप जास्त आहे. ऑटोमोबाइल आणि वाहन निर्मिती क्षेत्रात सर्वाधिक वाढ दिसून आली आहे, जिथे २०२५ मध्ये पगारात ९.८ टक्के पगारवाढ होऊन ती २०२६ मध्ये ९.९ टक्के पर्यंत पोहोचेल. त्यानंतर, बँकिंग क्षेत्रात पगारात सुमारे ८.४ टक्के वाढ झाली असून आता ती ८.८ टक्केपर्यंत वाढण्याचा अंदाज आहे. रसायन आणि अभियांत्रिकी क्षेत्रातही सुमारे ८.५ टक्केवाढ झाली असून आता त्यात ८.८ टक्केवाढ दिसून येत आहे. टेक कन्सल्टिंग क्षेत्रात परिस्थिती वेगळी आहे, जिथे आयटी सेवांमध्ये पगाराच्या वाढीचा दर सर्वात कमी, सुमारे ६.८ टक्के आहे.

**कर्मचारी गळतीचा दर**

सर्वेक्षणानुसार, एकूण कर्मचारी गळतीचा दर सातत्याने कमी होत आहे. २०२५ मध्ये तो १६.२ टक्केपर्यंत कमी झाला असून, तो कोविड-१९ पूर्वीच्या पातळीच्या जवळ पोहोचला आहे. हा दर २०२४ मध्ये १७.७ टक्के आणि २०२३ मध्ये १८.७ टक्के होता. तज्ज्ञांच्या मते, कंपन्या आता केवळ पगारावर लक्ष केंद्रित करण्याऐवजी कौशल्ये, कामगिरी आणि करिअरमधील प्रगतीवर अधिक लक्ष केंद्रित करत आहेत. त्यामुळे, वारंवार नोकऱ्या बदलण्याऐवजी, कर्मचारी आता अशा नोकऱ्या शोधत आहेत, ज्यात चांगली पगारवाढ, त्यांच्या कामाची स्पष्ट समज आणि त्यांच्या चांगल्या कामासाठी योग्य मान्यता मिळेल.

--------------

### एसपी तेगबीर सिंह संधू यांनी श्रीक्षेत्र राजूर

त्यांच्या कार्यक्षमतेसाठी ओळखले जातात आणि त्यांना नाशिक ग्रामीण आणि मालेगाव भागात पोलीस अधीक्षक/अप्पर पोलीस अधीक्षक म्हणून काम करण्याचा अनुभव आहे. मात्र, नव्या पोलीस अधीक्षकांसमोर अनेक आव्हाने उभी आहेत. जिल्ह्यातील कायदा व सुव्यवस्था पूर्वपदावर आणणे, शहरातील वाढती वाहतूक कोंडी सोडवणे, प्रमुख रस्त्यांवरील विस्कळीत वाहतूक सुरळीत करणे, तसेच गुन्हेगारांवर प्रभावी वचक निर्माण करणे ही त्यांच्यासमोरील प्रमुख जबाबदाऱ्या असणार आहेत. सध्या जालना शहरातील वाहतूक कोंडी आणि रहदारीची समस्या ही सर्वसामान्य नागरिकांसाठी रोजच्या त्रासाचा विषय बनली आहे. याशिवाय जिल्ह्यात पोलिसांची प्रतिमा अधिक सक्षम व विश्वासार्ह करण्याचे आव्हानही त्यांच्या समोर आहे. कडक शिस्तीचे अधिकारी म्हणून ओळख असलेल्या तेगबीर सिंह संधू जालन्यात पुन्हा कायद्याचे राज्य प्रभावीपणे कसे प्रस्थापित करतात, याकडे संपूर्ण जिल्हावासीयांचे लक्ष लागले आहे.

# महानगरपालिकेच्या दुर्लक्षामुळे ‘गरुड’ प्रतिमेची विटंबना

## सोशल मीडियावर व्हिडिओ व्हायरल; अज्ञात तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल

जालना । प्रतिनिधी

**जालना शहर महानगरपालिकेच्या दुर्लक्षामुळे मोतीबाग तलाव परिसरात सुशोभीकरण प्रकल्पाला लक्ष्य केल्याची धक्कादायक घटना समोर आली आहे. तलाव परिसरात बसवण्यात आलेल्या ’गरुड’ प्रतिमेचे विटंबना करून नुकसान करणाऱ्या एका अज्ञात तरुणाविरुद्ध चंदनझिरा पोलीस ठाण्यात गुन्हा नोंदवण्यात आला आहे.**

चंदनझिरा पोलिसांना दिलेल्या माहितीनुसार, जालना महानगरपालिकेमार्फत मोतीबाग तलाव परिसरात ’ब्युटीफिकेशन’ अंतर्गत गरुड प्रतिमा बसवण्यात आली आहे. दिनांक १ मे ते ४ मे २०२६ या कालावधीत, एका अंदाजे २० ते २५ वर्षे वयोगटातील अज्ञात तरुणाने तलावाच्या भिंतीवर ( २१ चौपाटी) बसवलेल्या गरुड प्रतिमेवर चढून तिचे विटंबना करून नुकसान केले. संबंधित तरुणाने या कृत्याचे चित्रीकरण करून तो व्हिडिओ सोशल मीडियावर व्हायरल केला होता. महानगरपालिका कर्मचाऱ्यांनी फिर्याद देऊन महानगरपालिका ची जबाबदारी दूर केली परंतु सदरील प्रकरणी महानगरपालिका संबंधित अधिकारी कर्मचारी जबाबदार असल्याचे बोलल्या जात आहे. महानगरपालिकेत कार्यरत असलेले श्री. आरेफ बेग वहीद बेग यांनी याप्रकरणी अधिकृत फिर्याद दिली आहे. सोशल मीडियावर व्हिडिओ व्हायरल झाल्यानंतर, त्यांनी सहकारी कर्मचाऱ्यांसह घटनास्थळी जाऊन पाहणी केली असता, प्रतिमेच्या रंगाचे आणि मूळ संरचनेचे नुकसान झाल्याचे निदर्शनास आले. सार्वजनिक मालमत्तेचे जाणीवपूर्वक नुकसान केल्याप्रकरणी त्यांनी कायदेशीर कारवाईची मागणी केली. या फिर्यादीवरून चंदनझिरा पोलिसांनी अज्ञात आरोपीविरुद्ध खालील कलमान्वये गुन्हा दाखल केला आहे: सार्वजनिक संपत्ती नुकसान प्रतिबंधक अधिनियम, १९८४ चे कलम ३ भारतीय न्याय संहिता, २०२३ चे कलम ३२४(३) या प्रकरणाचा पुढील तपास पोलीस निरीक्षक तपास करत आहेत. सार्वजनिक मालमत्तेचे नुकसान करणाऱ्या प्रवृत्तींविरुद्ध कडक पावले उचलली जातील, असे पोलीस प्रशासनाकडून स्पष्ट करण्यात आले आहे.

दैनिक
# राज्य लोकतंत्र
नवी दिशा... नवे विचार.....
मंगळवार, दि. ०५ मे २०२६



# माजलगावात विकासाच्या नावाखाली शासनाच्या तिजोरीवर उघड 'डाका'; सुवर्ण जयंती योजना की भ्रष्टाचाराचा बाजार?

माजलगाव । प्रतिनिधी


नगरपरिषद अंतर्गत सुरू असलेल्या 'सुवर्ण जयंती नगरोत्थान' योजनेतील कामांनी भ्रष्टाचाराचा कळस गाठला असल्याचा आरोप होत आहे. अभियंता, मुख्याधिकारी (सीओ) आणि गुत्तेदार यांनी राजकीय पाठबळाच्या जोरावर शहराच्या विकासाऐवजी जनतेच्या पैशांची उघड लूट सुरू केल्याचे गंभीर चित्र समोर आले आहे.

मनूर रोड व नवीन कब्रस्तान रोडवरील कामे म्हणजे निकृष्ट दर्जाचा नमुना ठरत आहेत. रस्ते बांधून काही दिवसही होत नाहीत तोच तडे, चिरे आणि उखडलेले काँक्रीट दिसू लागले आहे. भर उन्हाळ्यात पाणी न मारता केलेल्या कामांमुळे रस्ते अक्षरशः फसले असून, काम पूर्ण की फक्त बिल पूर्ण? असा संतप्त सवाल नागरिक विचारत आहेत.

गटारी व नाल्यांची अवस्था तर आणखीच बिकट-तुटक, वाकडी-तिकडी आणि अर्धवट कामे उघडपणे केली जात आहेत. सिमेंटमध्ये भेसळ, वाळूऐवजी डस्ट-पावडर, निकृष्ट खडी-सगळे नियम धाब्यावर बसवून काम केल्याने संपूर्ण प्रकल्पच संशयाच्या भोवऱ्यात आहे.

धक्कादायक बाब म्हणजे, या सगळ्याचे व्हिडिओ पुरावे समोर येऊनही संबंधित अधिकारी व पदाधिकारी गप्प असल्याने वरपर्यंत साखळी आहे का? असा प्रश्न शहरभर चर्चेत आहे. नगरसेवक व नगराध्यक्ष यांचेही या प्रकाराकडे दुर्लक्ष होत असल्याने नागरिकांमध्ये संताप उफाळून आला आहे.

या कामांची तात्काळ थर्ड पार्टी चौकशी, काँक्रीट क्यूब टेस्ट, तसेच सिमेंट, वाळू, खडी यांचे गुणवत्ता अहवाल जाहीर करण्याची मागणी जोर धरत आहे. दोषींवर कडक



कारवाई करून जबाबदारी निश्चित करावी, अशी मागणी नागरिकांकडून होत आहे.महाराष्ट्र राज्य बांधकामगार सेना संघटनेचे तालुकाध्यक्ष तथा समाजवादी पक्षाचे माजी तालुकाध्यक्ष नवीदोद्दीन मुस्ताक सिद्दिकी (माजलगाव) यांनी इशारा दिला आहे की, तात्काळ कारवाई न झाल्यास जिल्हाधिकारी कार्यालयावर तीव्र आंदोलन छेडले जाईल. तसेच हा मुद्दा विधानसभेत मांडून सखोल चौकशी लावली जाईल, असा थेट इशाराही त्यांनी दिला आहे.

## थोडक्यात

### बुखारी उर्दू उच्च माध्यमिक विद्यालयाची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव येथील बुखारी उच्च माध्यमिक विद्यालयाने उत्कृष्ट निकालाची यशस्वी परंपरा कायम राखली असून उच्च माध्यमिक प्रमाणपत्र परीक्षा फेब्रुवारी २०२६ मध्ये उच्च माध्यमिक मंडळा मार्फत घेण्यात आलेल्या परीक्षेत विज्ञान शाखेचा निकाल ८५.७१ टक्के तसेच कला शाखेचा ७१.४२ टक्के निकाल लागला आहे. विज्ञान शाखेतून मोहम्मद अफफान मोहम्मद नदीम याने ६३.१७ % गुण मिळवले व कला शाखेतून फिजा आदील कुरेशी हिने ७५. ५० % गुण मिळवले.उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे बुखारी उर्दू एजूकेश्नल संस्थेचे सचिव खुर्शिद नाईक साहेब व संस्थेचे अध्यक्ष अझहर नाईक साहेब संस्थेचे सहसचिव इम्रान नाईक साहेब प्राचार्य शेख हारुन बशीरोद्दिन, सहशिक्षक युसुफ देशमुख सर शेख अब्दुल गनी सर शेख अझहर सर तसेच सहशिक्षिका शेख फरहीन तबस्सुम , शेख शाहिस्ता मैडम यांनी अभिनंदन केले व पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या.

### स्वर भक्ती संगीत क्लासेसचा शुभारंभ

बीड । प्रतिनिधी

कला क्षेत्रात संपूर्ण कुटुंबानेच सहभाग घेऊन आपल्या कलेच्या माध्यमातून विविध ठिकाणी रसिक प्रेक्षकांची मने जिंकली असे जायभाये कुटुंबातील संगीत विशारद सुरंजन यांच्या स्वर भक्ती संगीत क्लासेसचा शुभारंभ मच्छिंद्र गडाचे मठाधिपदी स्वामी जनार्दन महाराज यांच्या हस्ते फीत कापून करण्यात आला,या क्लासेस मुळे बीड शहरातील नवोदित विद्यार्थ्यांना संगीताचे मार्गदर्शन होणार आहे. यावेळी गुरुकुल पब्लिक स्कूल संस्थेचे संचालक अखिलेश जी ढाकणे,फुलसांगवी गावचे सरपंच सौ संगीता भास्कर राव सानप गोविंद महाराज शिंदे आळंदी,महादेवजी घोळवे,अक्षय महाराज तळेकर,बाळू सानप तलाठी,ऋतुजा गाडीवान,भाऊसाहेब तकिक जेष्ठ पत्रकार महेश वाघमारे,संपादक प्रशांत सुलाखे,वसुदेव काजळे,नामदेव साळुंखे,भरत अण्णा लोळगे दीपक मुळे,के सी चव्हाण, खेडकर,तबला वादक नरहरी दळे,वेद मुळे व देव मुळे , सुग्रीव महाराज डाके,हरी महाराज भोसले,सुनील महाराज घोडके,गोविंद लोळगे,सुधीर जोशी,सचिन मार्गे आदी कलावंत आणि मित्र परिवार उपस्थित होते. यावेळी स्वर भक्ती संगीत क्लासेसच्या वतीने हौसराव जायभाये,श्री व सौ विकास जायभाये,भक्ती आणि सुरंजन यांनी आलेल्या मान्यवरांचे स्वागत केले. या संगीत क्लासेस मध्ये शास्त्रीय गायन,उपशास्त्रीय गायन,भजन,भावगीत,भक्तीगीत,गझल गायन,हार्मोनियम, तबला,पखवाज,ढोलकी,वादन आदी विषय शिकवले जाणार असून अद्यावत वाद्य साहित्य उपलब्ध करून देण्यात आले आहे




### एचएससी परीक्षेत जवळा उच्च माध्यमिक विद्यालयाची यशाची परंपरा कायम

बीड । प्रतिनिधी

आचार्य विनोबा भावे शिक्षण प्रसारक मंडळ बीड द्वारा संचलित जवळा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचा बारावी बोर्ड परीक्षेचा कला शाखेचा एकूण निकाल ८४ % एवढा लागला आहे .

या उच्च माध्यमिक विद्यालयाच्या कार्यकाळातील मागील दोन तपापासून अर्थात२४ वर्षाच्या वाटचालीतील प्रत्येक बोर्ड परीक्षेत या विद्यालयातील विद्यार्थ्यांनी आपला गुणवंत ते यशवंत हा सोपा वाटणारा परंतु प्रत्यक्षात अत्यंत अवघड असणारा खडतर प्रवास या ठिकाणच्या उच्च माध्यमिक शिक्षकांच्या अचूक मार्गदर्शनाने यशस्वी पूर्ण केलेला आहे. या प्रवासाचं आणखीन एक सोनेरी पान शैक्षणिक वर्ष २०२५ - २६ च्या बारावी बोर्ड परीक्षेतील निकालाच्या माध्यमातून इतिहासाच्या पानावर कोरलं गेल आहे. काल ऑनलाईन पद्धतीने जाहीर झालेल्या बारावी बोर्डाच्या निकालात या शाळेतील कु.गोरे मोहीनी किशोर या विद्यार्थिनीने ७३.३३% गुण प्राप्त करत सर्वप्रथम येण्याचा मान मिळवला तर बोरवडे विद्या रमेश ६९.५०% गुण मिळवून द्वितीय स्थान व माळी स्वप्निल पंढरीनाथ याने ६६.८३% गुणांसह तृतीय स्थान मिळवलं. विशेष बाब म्हणजे अंथरवन पिंपरी तांडा या केंद्रातून कला शाखेचे पहिले तीनही यशवंत जवळा माध्यमिक व उच्च माध्यमिक विद्यालयाचेच आहेत. या दैदिप्यमान यशाकरता सर्व यशवंतांचे संस्था अध्यक्ष माजी आ.राजेंद्रजी जगताप, सचिव युवराज जगताप, ज्येष्ठ संचालक शंकरराव जगताप, मु. अ. तथा प्राचार्य रोहिदास डोंगरदिवे, पर्यवेक्षक रमेश डोळे आणि सर्व शिक्षक व शिक्षकेतर कर्मचारी यांच्यासह पंचक्रोशीतील सर्व शिक्षणप्रेमी नागरिकांनी अभिनंदन केले आहे.

## देशाच्या विकासात महाराष्ट्राचे मोठे योगदान -श्रीमती सुदामतीताई वाघ

### शिदोड येथील श्री महालक्ष्मी विद्यालयात महाराष्ट्र दिन उत्साहात साजरा

बीड । प्रतिनिधी

प्राचीन संस्कृतीचा वारसा सांभाळतानाच देशाच्या विकासात महाराष्ट्राने नेहमीच हिरीरीने सहभाग घेत मोठे योगदान दिले आहे. महाराष्ट्राचा हाच प्रेरणादायी इतिहास आदर्श माणुन विद्यार्थ्यांनी नवनवीन क्षेत्रे पादाक्रांत करावीत असे आवाहन शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळाच्या संस्थापक अध्यक्षा श्रीमती सुदामतीताई वाघ यांनी शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात महाराष्ट्र दिनी ध्वजारोहणा नंतर विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना केले. यावेळी व्यासपीठावर संस्थेचे सचिव आदरणीय नामदेवराव वाघ, गावातील प्रतिष्ठित नागरिक दिलीपराव जोगदंड, शाळेचे मुख्याध्यापक दत्तात्रय चव्हाण, आत्माराम वाव्हळ, श्रीमती फाटे मॅडम, श्रीमती साळुंके मॅडम, श्रीमती सानप मॅडम आदी उपस्थित होते.

बीड शहरा पासून जवळच असलेल्या शिदोड येथील श्री महालक्ष्मी माध्यमिक विद्यालयात १ मे महाराष्ट्र दिन अत्यंत उत्साहात आणि चैतन्यमय वातावरणात साजरा करण्यात आला. कार्यक्रमाच्या सुरुवातीला महापुरुषांच्या प्रतिमेचे पूजन करण्यात आले. त्यानंतर शिवनेरी शिक्षण प्रसारक मंडळ बीड या संस्थेच्या संस्थापक अध्यक्षा श्रीमती सुदामतीताई वाघ यांच्या हस्ते ध्वजारोहण करण्यात आले. ध्वजारोहणानंतर काही निवडक



विद्यार्थी आणि शिक्षकांनी मनोगत व्यक्त केले. त्या नंतर कार्यक्रमाच्या अध्यक्षस्थानावरून बोलताना श्रीमती सुदामतीताई वाघ यांनी महाराष्ट्राच्या वैभवशाली इतिहासाचा जागर केला. यावेळी पुढे बोलताना श्रीमती सुदामतीताई वाघ म्हणाल्या की, देशात सामाजिक सुधारणा आणि सांस्कृतिक वारसा जपण्यात महाराष्ट्राचे योगदान अतुलनीय आहे. प्राचीन संस्कृतीचा वारसा सांभाळताना देशाच्या विकासात महाराष्ट्राने नेहमीच हिरीरीने सहभाग घेतला आहे. महाराष्ट्राच्या या प्रेरणादायी इतिहासाला विद्यार्थ्यांनी आदर्श माणुन नवनवीन क्षेत्रे पादाक्रांत करावीत असे शेवटी विद्यार्थ्यांना आवाहन केले. अध्यक्षा श्रीमती सुदामतीताई वाघ यांच्या भाषणानंतर इयत्ता ८ वी आणि ९ वीच्या विद्यार्थ्यांचा निकाल जाहीर करण्यात आला. यावेळी सर्व मान्यवरांनी इयत्ता ८वी आणि ९ वी वर्गातील यशस्वी गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करून त्यांच्या पुढील शैक्षणिक वाटचालीस शुभेच्छा दिल्या. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन आत्माराम वाव्हळ सर यांनी केले, तर उपस्थितांचे आभार दत्तात्रय चव्हाण यांनी मानले. खाऊ वाटपाने कार्यक्रमाची सांगता करण्यात आली. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी आणि विद्यार्थ्यांनी परिश्रम घेतले.

## पान ६ वरुन...

### पाटोद्यात शेतकऱ्यांची

असता, कुटुंबीयांनीही तो कुठे आहे याबाबत आपल्याला काहीच माहिती नसल्याचे सांगत हात वर केले. त्यामुळे आपली फसवणूक झाल्याची खात्री पटताच शेतकऱ्यांच्या पायाखालची जमीन सरकली.पोलीस ठाण्यात तक्रारींचा ओघआज नफरवाडी, नागशवाडी, बेलेवाडी आणि वाघिरा परिसरातील मोठ्या संख्येने शेतकऱ्यांनी पाटोदा पोलीस ठाणे गाठले. शेतकऱ्यांनी पोलिसांना लेखी निवेदन देऊन आपबिती सांगितली. या फसवणुकीचा आकडा मोठा असण्याची शक्यता वर्तवण्यात येत आहे.शेतकऱ्यांची मागणी:आम्ही घाम गाळून पीक पिकवले, मुलांची लग्ने, शिक्षण आणि कर्जाचे हप्ते फेडण्यासाठी हा पैसा गरजेचा होता. संबंधित आडत व्यापाऱ्यावर तात्काळ गुन्हा दाखल करून त्याला अटक करावी आणि आमचे हक्काचे पैसे व्याजासह परत मिळवून द्यावेत, अशी आर्त हाक शेतकऱ्यांनी प्रशासनाला दिली आहे.या घटनेमुळे संपूर्ण पाटोदा तालुक्यात खळबळ उडाली असून, व्यापाऱ्यांच्या विश्वासार्हतेवर आता प्रश्नचिन्ह उपस्थित केले जात आहे. आता पोलीस या प्रकरणात काय कारवाई करतात, याकडे संपूर्ण जिल्ह्याचे लक्ष लागले आहे.

### अवैध वाळू वाहतुकीवर

सय्यद हसन (वय ४६ वर्षे, रा. लिंबागणेश, ता. जि. बीड) याला ताब्यात घेण्यात आले आहे. या प्रकरणी गेवराई पोलीस ठाण्यात गुन्हा रजिस्टर क्रमांक २७०/२०२६, कलम ३०३(२) नुसार गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या कारवाईत पोलीस निरीक्षक किशोर पवार यांच्यासह सहाय्यक फौजदार नितीन शिंदे, पोलीस हवालदार कल्याण राठोड, पोलीस कॉन्स्टेबल गोरक्ष डोके आणि जितेंद्र ओव्हाळ यांनी सहभाग घेतला. पुढील तपास पोलीस करत आहेत.

### गेवराईत युवानेते रोहित

आणि ग्रामीण भागातील शेतकऱ्यांच्या संपर्कात असतात. परंतु गेवराई शहरांमध्ये सुद्धा आलेल्या लोकांचा संपर्क होऊन त्यांची कामे व्हावी यासाठी त्यांनी जनसंपर्क कार्यालय सुरू केले आहे. आता या कार्यालयातून गोरगरिबांची कामे करण्यासाठी त्यांनी जास्तीत जास्त वेळ द्यावा. जी कामे स्थानिक स्तरावर होणार नाही ती माझ्यापर्यंत कळवावी, मी ती कामे पूर्ण करण्याचा प्रयत्न करेल, असा विश्वास यावेळी बदामराव पंडित यांनी दिला. यावेळी युवा नेते रोहित पंडित म्हणाले की, माझ्याकडे शहरासह ग्रामीण भागातील अनेक लोक येतात. त्यांची कामे मी प्रामाणिकपणे करण्याचा प्रयत्न करतो. अनेक कामे बदामराव आबा पंडित यांच्या कानावर घालून तीही करून घेतो. पण शहरात आल्यानंतर लोकांच्या अडचणी होऊ नये म्हणून या ठिकाणी आपण जनसंपर्क कार्यालय सुरू केले आहे. या कार्यालयाच्या माध्यमातून येणाऱ्या प्रत्येकाचं काम करण्याचा प्रामाणिक प्रयत्न करून, भारतीय जनता पार्टी चे संघटन वाढवत पक्षाचे विचार सामान्य जनतेपर्यंत पोहोचविण्याचे आपण काम करणार असल्याचेही ते म्हणाले. युवा नेते रोहित पंडित यांच्या भारतीय जनता पार्टी जनसंपर्क कार्यालयाच्या शुभारंभ प्रसंगी त्यांना राज्याच्या पर्यावरण मंत्री ना पंकजाताई मुंडे, माजी खा प्रीतमताई मुंडे, भाजप नेते माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, भाजपनेते बाळराजे पवार, जिल्हाध्यक्ष शंकरराव देशमुख, बीड जिल्हा परिषदेचे माजी अर्थ व बांधकाम सभापती युधाजित पंडित यांनीही शुभेच्छा दिल्या.

### राम कथेची १ लाख

जे म्हातारपण सांभाळतात त्यांना आशीर्वाद प्राप्त होते. भक्ति कशाला म्हणतात- ज्याने मी प्रसन्न होतो ती भक्ती. असे संजय महाराज पाचपोर यांनी सांगितले.

कथेचा एक रुपयाही न घेता संजय महाराजांनी गोसेवेचा आणि संत सेवेचा अनोखा संदेश

संत बंकट स्वामी महाराज यांच्या पुण्यतिथी उत्सवात सात दिवस भव्य श्री राम कथा संपन्न झाली. कथा श्रवणासाठी हजारो भाविक भक्त भक्तीरसामध्ये नाहून निघत होते. या कथेसाठी उत्सव समिती यांच्याकडून रामानाचार्य संजय महाराज पाचपोर यांना दोन लाख रुपये बिदागी देण्यात आली. त्यापैकी संजय महाराज पाचपोर यांनी स्वतःच्या हाताने एक लाख रुपये निळकंठेश्वर गोशाळा लातूर यांना गाईच्या चाऱ्यासाठी दिले तर उरलेले एक लाख रुपये बंकट स्वामींच्या रथासाठी परत संस्थांना माघारी दिले. कथेचा एक रुपयाही न घेता संजय महाराजांनी गोसेवेचा आणि संत सेवेचा अनोखा संदेश दिला आहे.

### श्रीमती दुधाळ यांनी

श्रीफळ आणि बुके देऊन सत्कार केला. दोघांनाही कपड्यांचा आहेर स्टाफने केला. यावेळी मा.सरपंच भाऊराव प्रभाळे, ग्रामसेविका श्रीमती लेकुरवाळे,मु.अ. श्री पोहरे , प्रा लक्ष्मण गुंजाळ,प्रा.बापू प्रभाळे इत्यादींची समायोजित भाषणे झाली. या सर्वांनी त्यांच्या कार्याचा गौरव केला आणि भावी आयुष्यासाठी शुभेच्छाए दिल्या. सत्काराला उत्तर देताना श्रीमती दुधाळ म्हणाल्या की मला सर्व शिक्षक सहकाऱ्यांचे चांगले सहकार्य मिळाले सुरुवातीपासूनच मला शालेय काम करण्याची आवड असल्याने मी काम करत गेले. मला जिल्हा परिषदचा आदर्श शिक्षक पुरस्कार मिळाला, दोन विशेष वेतनवाढी मिळाल्या. विद्यार्थी आपले दैवत असते आणि त्यांना शिकवणे हीच पूजा असते. अडचणी आल्या तर त्यावर मात करून विद्यार्थी हेच आपले दैवत आहे ही भावना सतत कायम ठेवली पाहिजे असेही त्या म्हणाल्या. श्रीमती दुधाळ यांच्या वतीने यावेळी शाळेला दर्जेदार अशा सहा खुर्च्या तसेच ४४ पुस्तकांचा संच भेट देण्यात आला. सर्व शिक्षकांना कपड्यांचा आहेर दिला. अत्यंत कौटुंबिक या शासकीय कार्यक्रमाचे श्रीमती सोनवणे यांनी सुंदर संचलन केले. श्रीमती सोनवणे यांनी कवितेच्या माध्यमातून आभार मानते. चहा-नाष्ट्या नंतर कार्यक्रमाची सांगता झाली.

### १५ दिवसांपासून इंधन कोरडे,

वाहनधारकांना रिकाम्या हाती परतावे लागत आहे. याचा थेट परिणाम प्रवासी वाहतूक आणि अत्यावश्यक सेवांवरही होत आहे.प्रशासनाचे मौन आणि अफवांचे पीकइंधन टंचाईचे नेमके कारण काय, याबाबत प्रशासनाकडून अद्याप कोणतेही अधिकृत स्पष्टीकरण देण्यात आलेले नाही. यामुळे बाजारपेठेत इंधनाचे दर वाढणार असल्याच्या अफवा पसरत असून, नागरिकांमध्ये भीतीचे वातावरण आहे. तेल कंपन्यांकडून होणारा पुरवठा विस्कळीत झाला आहे की ही कृत्रिम टंचाई आहे, असा सवाल आता नागरिक विचारत आहेत.तातडीने पुरवठा करण्याची मागणीपाटोदा तालुक्यातील जनतेची आणि शेतकऱ्यांची होणारी ओढाताण थांबवण्यासाठी जिल्हा प्रशासनाने आणि पुरवठा विभागाने तातडीने हस्तक्षेप करावा, अशी मागणी जोर धरत आहे. पुरवठा सुरळीत न झाल्यास आगामी काळात उग्र आंदोलन छेडण्याचा इशाराही स्थानिक नागरिकांनी दिला आहे.

## युसूफवडगांव विद्यालयाची बारावी परीक्षेत उज्वल निकालाची परंपरा कायम

युसूफवडगांव । प्रतिनिधी

काल २ मे २०२६ रोजी महाराष्ट्र राज्य माध्यमिक व उच्च माध्यमिक शिक्षण मंडळ पुणे एच. एस. सी. बोर्ड परीक्षा फेब्रुवारी मार्च २०२६ चा निकाल घोषित झाला असून त्यात युसुफ वडगाव माध्यमिक उच्च माध्यमिक विद्यालयाचा विज्ञान शाखेचा निकाल ९६.२५% लागला आहे. विद्यालयातून एकूण प्रविष्ट विद्यार्थी ८० ,प्रथम श्रेणीत १८, द्वितीय श्रेणीत ५७तर तृतीय श्रेणीत ०२ असे ७७ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.



तसेच विद्यालयाचा कला शाखेचा निकाल ८२ टक्के लागला असून एकूण प्रविष्ट विद्यार्थी ५० पैकी ४१ विद्यार्थी उत्तीर्ण झाले आहेत.विज्ञान शाखेतून प्रथम कु.मुळे समृद्धी विष्णू (७०%) द्वितीय कु.चौधरी अर्चिता विजय( ६७.८३%) तृतीय चि.मेनकुदळे जय दत्तात्रय( ६६.५०%) व चि.पटणे ओंकार शिवदास (६६.५०%) यांनी विज्ञान शाखेतून प्रथम,द्वितीय,तृतीय येण्याचा बहुमान पटकावला आहे.तर कला शाखेतून प्रथम कु.धनगर सारिका लाला( ७६.६७%) द्वितीय कु.ढवळे सुप्रिया गोपाळ (६३.८३%) तर तृतीय कु.शेख नेहा सलीम (५६.८३% )गुण घेऊन प्रथम द्वितीय तृतीय क्रमांकाने उत्तीर्ण झाले आहेत.

उत्तीर्ण व यशस्वी विद्यार्थ्यांचे संस्थेचे सचिव मा. श्री.दीपक दादा घुमरे,संस्था अध्यक्ष मा.श्री.सुकाळे यु .बी,विद्यालयाचे प्राचार्य श्री.भोसले ए.यु,उच्च माध्यमिक विभाग प्रमुख श्री.चव्हाण एन. एन. विद्यालयाचे घुमरे प्रदीप सर,प्राध्यापक,शिक्षक, पालकांनी,नागरिकांनी हार्दिक अभिनंदन केले असून पुढील वाटचालीस शुभेच्छा दिल्या आहेत.

## वकील संघाच्या अध्यक्षपदी भाई ॲड. गोले, उपाध्यक्ष ॲड. बजाज तर सचिवपदी ॲड. तेलगड

माजलगाव । प्रतिनिधी

माजलगाव वकील संघाच्या सन २०२६-२०२७ च्या कार्यकारिणीची निवडणूक दिनांक ३० एप्रिल रोजी उत्साहात व शांततेत पार पडली. या निवडणुकीत विविध पदांसाठी चुरशीची लढत पाहायला मिळाली असून अखेर निकाल जाहीर करण्यात आला.

अध्यक्षपदासाठी भाई ड. नारायण गोले पाटील यांनी दणदणीत विजय मिळवला. त्यांना एकूण १२७ मते मिळाली, तर प्रतिस्पर्धी ॲड. आरती गाडेकर यांना ५५ मते मिळाली. त्यामुळे भाईड.नारायण गोले पाटील हे ७२ मतांच्या फरकाने विजयी ठरले. उपाध्यक्षपदासाठी झालेल्या निवडणुकीत आर. आर. बजाज यांनी १०४ मते मिळवत विजय संपादन केला. त्यांचे प्रतिस्पर्धी ड बी. एस. घोडे यांना ८० मते मिळाली. त्यामुळे बजाज



हे २४ मतांनी निवडून आले. सचिवपदासाठी ॲड. एन. आर. तेलगड यांनी ११८ मते मिळवून बाजी मारली, तर बी. एस. घनघाव यांना ६६ मते मिळाली. यामध्ये ॲड. तेलगड हे ५२ मतांच्या फरकाने विजयी ठरले. दरम्यान, कोषाध्यक्षपदी इनामदार यांची बिनविरोध निवड झाली असून या निवडणुकीत निवडणूक निर्णय अधिकारी म्हणून ड एस आर आचार्य यांनी काम पाहिले तर सहाय्यक निवडणूक अधिकारी ड एस डब्ल्यू साळवे, ड शिंदे यांनी चांगल्या प्रकारे निवडणूक हाताळली, शेवटी विजयी उमेदवारांचे ड.विठ्ठलराव तिडके, ड. मच्छिंद्र डोंगरदिवे,ड.भानुदास डक, ड.सचिन सुतळे, ड.अखिलेश घाडगे, ड. विजय कुरे, ड, इंद्रजीत शिंदे, ड. विठ्ठल फपाळ, ड.रामेश्वर शेजुळ, ड.शामसुंदर गोंडे, ड.प्रल्हाद तौर, ॲड मनसबदार, यांनी विजयी उमेदवाराचे अभिनंदन केले..

## माजीमंत्री बदामराव पंडितांचा वाढदिवस गेवराई मतदारसंघात सामाजिक उपक्रमांनी साजरा

गेवराई । प्रतिनिधी

गेवराई विधानसभा मतदारसंघातील भाजप नेत, माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांना दैवत मानणाऱ्या गेवराई तालुक्यातील कार्यकर्ते व नागरिकांकडून दरवर्षी प्रमाणे याही वर्षी मोठ्या उत्साहात त्यांचा वाढदिवस साजरा करण्यात आला. गेवराई मतदार संघातील भाजप कार्यकर्त्यांनी गेवराई, माजलगाव आणि बीड तालुक्यात विविध सामाजिक उपक्रम राबविले.

भाजपा नेते, माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांच्या वाढदिवसानिमित्त त्यांच्या निवासस्थानी सौ गिरीकाभाभी पंडित, सौ अनुरूपाताई युधाजित पंडित यांनी औक्षण केले. याप्रसंगी जि.प. चे माजी अर्थ व बांधकाम सभापती युधाजित पंडित, युवानेते रोहित पंडित, युवानेते यशराज पंडित, राजवीर पंडित, नयनतारा पंडित यांची उपस्थिती होती. बदामराव पंडित यांना शुभेच्छा देण्यासाठी सकाळपासूनच शहरासह ग्रामीण भागातील विविध क्षेत्रातील पदाधिकाऱ्यांसह भाजप



पदाधिकारी, कार्यकर्ते व नागरिकांनी त्यांच्या निवासस्थानी गर्दी केली होती. बदामराव पंडित यांना दिवसानिमित्त पुस्तके त्यासोबतच वृक्ष, शाल, श्रीफळ व पुष्पहार देऊन आलेल्या चाहत्यांनी त्यांचा सत्कार करून शुभेच्छा दिल्या. यावेळी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांनी आलेल्या प्रत्येकाशी अस्थेवाईकपणे चर्चा केली. तालुक्यातल्या प्रत्येक गावात असलेल्या अडीअडचणी याचीही माहिती उपस्थितांकडून घेतली.

दिवसभर व्यापारी, सामाजिक कार्यकर्ते, पत्रकार व भाजप कार्यकर्त्यांची बदामराव पंडित यांच्या बंगल्यावर त्यांना शुभेच्छा देण्यासाठी मोठी गर्दी केली होती.

## गीता परिवार बीडतर्फे संस्कार शिबिर

बीड । प्रतिनिधी

बालकांचा सर्वांगीण विकास व्हावा व त्यांच्या बुद्धीला चालना मिळावी यासाठी गीता परिवार दरवर्षीप्रमाणे याही वर्षी दिनांक ६ मे ते १५ मे या दरम्यान द्वारकादास मंत्री राजस्थानी विद्यालय विप्रनगर येथे संस्कार वर्गाचे आयोजन करीत आहे. शिबिराची वेळ दुपारी साडेतीन ते साडेसहा पर्यंत आहे.

या मध्ये भगवद्गीता अध्याय, पसायदान, मंगलस्मरण, बौद्धिक खेळ, दांडिया, रांगोळी, योग सोपान, प्राणायाम, हास्ययोग, कालभैरवाष्टक टाकाऊतून टिकाऊ हस्तकला शिकवल्या जातील व दररोज अल्पोपहार दिला जाईल यासाठी फक्त दोनशे रुपये शुल्क आकारण्यात येत आहे. दररोज मुलांनी घरून वही पेन,



भगवद्गीता, दांडिया, आसन व रिकामा डबा आणावे, पालकांसाठी दिनांक ४ मे रोजी पाच वाजता संतोषी माता मंदिर येथे कार्यशाळा व चर्चासत्र याचे आयोजन केले आहे तरी या चर्चासत्रामध्ये शिबिरामध्ये सहभाग घेणाऱ्या मुलांच्या पालकांनी सामील व्हावे व जास्तीत जास्त आपल्या मुलांना या शिबिराचा लाभ घ्यावा ही गीता परिवारातर्फे नम्र विनंती चार मे नंतर रजिस्ट्रेशन करणाऱ्या मुलांसाठी अडीचशे रुपये शुल्क आकारण्यात येईल.

# राज्यावर पाणी संकटाची छाया

## धरणसाठा ४० टक्क्यांखाली ; मोठ्या प्रकल्पांमधील स्थिती चिंताजनक

पुणे : मे महिन्याच्या सुरुवातीलाच राज्याला पाणीटंचाईच्या झळा सोसाव्या लागत असून, धरणांमधीलपाणीसाठा वेगाने घटत आहे. जलसंपदा विभागाच्या २ मे २०२६ रोजी प्रसिद्ध ताज्या अहवालानुसार, राज्यातील ३,०२८ धरणांमध्ये आता केवळ ३८.८२ टक्के उपयुक्त पाणीसाठा शिल्लक आहे.

वाढत्या तापमानामुळे होणारे बाष्पीभवन आणि पाण्याचा वाढता वापर यामुळे जलसाठे तळाला जात असून, राज्यावर पाणीटंचाईचे सावट गडद होत आहे. राज्यातील एकूण साठवण क्षमता आणि सध्याची स्थिती पाहता, उपलब्ध असलेला १५,८५८.५५ द.ल.घ.मी. पाणीसाठा आगामी मान्सून येईपर्यंत पुरवणे हे प्रशासनासमोर मोठे आव्हान आहे. गतवर्षी याच काळात ३३.७६ टक्के साठा होता, त्या तुलनेत यंदाची टक्केवारी अधिक वाटत असली तरी, वाढत्या उष्णतेमुळे पाण्याचा उपसा वाढला आहे. विशेषतः ग्रामीण भागाची तहान भागवणाऱ्या लघु प्रकल्पांमध्ये केवळ ३५.८२ टक्के साठा शिल्लक राहिल्याने



गावखेड्यांत पिण्याच्या पाण्याचे संकट निर्माण होण्याची शक्यता आहे. जलाशयांच्या पाणीपातळीत होत असलेली ही सातत्यपूर्ण घट आगामी काळात टँकरच्या संख्येत वाढ होण्याचे संकेत देत आहे.

उपलब्ध साठा मर्यादित असल्याने आणि पाण्याचे बाष्पीभवन वेगाने होत असल्याने आतापासूनच पाण्याचे नियोजन करणे अनिवार्य ठरत आहे. जर मान्सूनला विलंब झाला, तर परिस्थिती अधिक बिकट होऊ शकते. त्यामुळे प्रशासनाकडून पाण्याचा काटकसरीने वापर करण्याचे आवाहन केले जात असून, पिण्याच्या पाण्याला सर्वोच्च प्राधान्य देण्याचे धोरण राबवले जात आहे.

मोठ्या प्रकल्पांमधील स्थितीही फारशी समाधानकारक नाही. राज्यातील १३८ मोठ्या धरणांमधील साठा ३८.६७ टक्क्यांपर्यंत खाली आला आहे. काही महत्त्वाच्या जलाशयांची पातळी तर अत्यंत चिंताजनक स्थितीत पोहोचली आहे. सोलापूर जिल्ह्यासाठी महत्त्वपूर्ण असलेल्या उजनी धरणात अवधा ७.२१ टक्के साठा उरला असून, हे धरण मृत साठ्याच्या उंबरठ्यावर आहे. तसेच कोयना (२७.१४ टक्के) आणि विष्णूपुरी (२७.३१ टक्के) यांसारख्या प्रमुख प्रकल्पांमधील पाणीसाठा ३० टक्क्यांच्या खाली गेल्यामुळे सिंचन आणि वीजनिर्मितीवरही याचे परिणाम दिसून येऊ शकतात.

# मेथी पिकातून अधिक उत्पादन घेण्यासाठी या टिप्स ठेवा लक्षात



शेतकरी आता पारंपारिक शेती सोडून आधुनिक शेतीचा अवलंब करून शेतीतून अधिक नफा मिळवत आहेत. या पिकांची मागणी देशांतर्गत आणि परदेशी बाजारपेठेत बऱ्यापैकी आहे. देशातील शेतकरी त्यांच्या शेतात विविध प्रकारची पिके घेत आहेत. या पिकांमध्ये मेथी पिकाचाही समावेश होतो, जो शेतकऱ्यांना खूप फायदेशीर आहे. अलीकडेच कृषी तज्ज्ञांनी मेथी लागवड करणाऱ्या शेतकऱ्यांसाठी महत्त्वपूर्ण सल्ला दिला आहे. जेणेकरून शेतकऱ्यांना वेळेत अधिक नफा मिळू शकेल.

रोगांपासून संरक्षण : मेथी ही पुदिन्यासारखी दिसणारी वनस्पती आहे, जी अनेक कामांसाठी वापरली जाते. मेंथी पिकाच्या वेळी शेतकऱ्यांनी दीमकांचा प्रादुर्भाव होणार नाही याची काळजी घ्यावी. कारण या पिकावर दीमकाचा प्रादुर्भाव होण्याची शक्यता खूप जास्त आहे. जर दीमक एकदा पिकावर प्रादुर्भाव करत असेल तर ते संपूर्ण पीक खराब करू शकतात. याला प्रतिबंध करण्यासाठी शेतकऱ्यांनी पिकावर २.५ लिटर क्लोरपायरीफॉस प्रति हेक्टरी फवारणी करावी. याशिवाय केसाळ सुरवंट देखील मेंथी पिकावर प्रादुर्भाव करतात ज्यामुळे पिकाची पाने नष्ट होतात. या किडीपासून पिकाचे संरक्षण करण्यासाठी शेतकऱ्यांनी ५०० एम. डायक्लोरव्हास ७००-८०० लिटर पाण्यात विरघळवून पिकावर पूर्णपणे फवारणी करावी.मेंथी पानांची सुरक्षितता : मेंथा पिकाची योग्य काळजी न घेतल्याने मेंथीच्या पानांवर तपकिरी रंगाचे डाग पडतात. हे डाग मेंथाच्या पानांचा नाश करतात. या रोगामुळे पाने पिवळी पडू लागतात व सुकून पडतात. हे टाळण्यासाठी शेतकऱ्याने २ किलो मॅन्कोझेब ७५ डब्ल्यूपी ८००-१००० लिटर पाण्यात विरघळवून प्रति हेक्टरी फवारणी करावी.

रोपे लावताना या गोष्टी लक्षात ठेवा : मेंथी पिकाचे चांगले उत्पादन घेण्यासाठी शेतकऱ्याने लागवड करताना काही गोष्टी लक्षात ठेवाव्यात. उदाहरणार्थ, प्रथम झाडाला ०.१ टक्के कार्बेन्डाझिमच्या द्रावणात सुमारे १५-२० मिनिटे बुडवा. त्यानंतरच शेतात रोप लावावे. असे केल्याने पिकाची वाढ चांगली होते आणि रोगाची शक्यताही कमी होते.

# बुरशीमुळे कोंबड्यांना विषबाधा आणि नियंत्रण

कोंबड्यांतील मरतुकीच्या अनेक कारणांपैकी बुरशीमुळे विषबाधा हे एक कारण असून, या आजारांमध्ये इतर आजारांच्या तुलनेत जास्त प्रमाणात मरतूक आढळून येते. खाद्यातील अचानक बदल व ओलावा बुरशीच्या वाढीस उपयुक्त ठरतो. कुक्कुटपालनात खाद्यावर ७५ ते ८० टक्के खर्च होतो. पावसाळा व हिवाळा ऋतूमध्ये खाद्यामध्ये बुरशी तयार झाल्यामुळे कोंबड्यांमध्ये विषबाधा आढळून येते. खाद्य आणि त्यातील घटक बुरशीच्या वाढीस आणि त्यांचे विष तयार करण्यास अनुकूल असतात.

अफ्लाटॉक्झिन : या विषामुळे होणाऱ्या विषबाधेला अफ्लाटॉक्झिकोसिस म्हणतात. हे विष बुरशीच्या अनेक प्रजातींपासून तयार होते. ॲस्परजिलस फ्लेवस ही प्रजाती सर्वांत जास्त विष तयार करते. नैसर्गिकरीत्या अफ्लाटॉक्झिनचे बी-१, बी-२, जी-१ आणि जी-२ असे चार प्रकार आहेत. बी-१ हा प्रकार सर्वांत जास्त विषारी असून, कोंबड्यांच्या यकृतास हानिकारक असतो.

ऑकराटॉक्झिन : ऑकराटॉक्झिनपासून होणाऱ्या विषबाधेला ऑकराटॉक्झिकोसिस म्हणतात. ॲस्पर्जिलस व पेनिसिलियम बुरशीच्या प्रजाती हे विष तयार करतात. प्रामुख्याने ॲस्परजिलस ऑकरासियस ही बुरशी अधिक प्रमाणात ऑकराटॉक्झिन तयार करते. ऑकराटॉक्झिनचे ए, बी, सी आणि डी असे चार प्रकार असतात. ऑकराटॉक्झिन ए हे अधिक विषारी असून, जास्त प्रमाणात आढळते. खाद्यामध्ये हे विष जरी कमी प्रमाणात



आढळत असले तरी कोंबड्यांमध्ये या विषामुळे होणारे नुकसान अधिक प्रमाणात असते. मूत्रपिंड व मूत्रनलिकेला हे हानिकारक असल्याने पक्ष्यांमध्ये मरतुकीचे प्रमाण जास्त आढळून येते.

परिणाम : अंडी उत्पादनात घट, रोगप्रतिकारशक्ती कमी होऊन अनेक संसर्गजन्य आजारांना बळी पडणे, अंड्यांची उबवणक्षमता कमी होणे, अशक्तपणा, पांगळेपणा, पाणी व आहार ग्रहणात घट, हगवण, पंख खडबडीत होणे व जास्त प्रमाणात मरतुकीचे प्रमाण इत्यादी लक्षणे आढळून येतात. कोंबड्यांचे शवविच्छेदन केल्यास अफ्लाटॉक्झिकोसिसमध्ये यकृताला सूज, पिवळेपणा व नरमपणा येतो. तसेच, ऑकराटॉक्झिकोसिसमध्ये मूत्रपिंड लाल व मोठे होते आणि मूत्रनलिकेत पांढऱ्या रंगाचे युरिक ॲसिड जास्त प्रमाणात जमा झाल्याचे आढळून येते.

उपाययोजना : विषबाधेवर प्रत्यक्ष गुणकारी औषध नाही. विषबाधा झालेल्या कोंबड्यांना पूरक औषध म्हणून लिव्हर टॉनिक व जीवनसत्त्वे पाण्यात मिसळून द्यावीत. हळद पावडर ५० ग्रॅम प्रति १०० किलो खाद्यामध्ये किंवा १ ग्रॅम प्रति २ लिटर पिण्याच्या पाण्यामध्ये ४ दिवस दिल्यास बुरशीमुळे कोंबड्यांमधील मरतूक कमी करता येते. विषबाधेवर प्रतिबंधक उपाय म्हणून कुक्कुट खाद्यामध्ये ओलावा किंवा बुरशीची वाढ झाली नाही ना, याची खात्री करावी. खराब व ओलसर झालेले धान्य खाद्यात वापरू नये. खाद्यांची साठवण जमिनीच्या वर एक ते दीड फूट उंचावर करावी. खाद्य हे जीवाणू, विषाणू, बुरशी आणि विषारी घटक आणि निरुपयोगी घटकांपासून मुक्त असावे. खाद्य जास्त कालावधीसाठी साठवून ठेवू नये, त्यामध्ये बुरशीची वाढ होऊ देऊ नये. खाद्य कोरड्या जागेवर व सभोवताली हवा खेळती राहील अशा ठिकाणी साठवून ठेवावे. खाद्यगृहामध्ये उंदीर, घुशी, पक्षी, कुत्रे जाणार नाही याची काळजी घ्यावी. कोंबड्यांना मॅश फीडऐवजी गोळी तुकडा खाद्य देणे फायदेशीर ठरते. तज्ज्ञांच्या सल्ल्यानुसार वेळोवेळी खाद्यामध्ये बदल करून कोंबड्यांचे खाद्य व्यवस्थापन करावे. कोंबड्यांना खाद्य देताना ते सांडणार नाही याची काळजी घ्यावी.

# कमी पाण्यातही ऊस योग्य पद्धतीने वाढण्यासाठी उपाय

ऊस हे महत्त्वाचे नगदी पीक असून, त्याची वाढ उत्पादन आणि गुणवत्ता ही प्रामुख्याने पाण्यावर अवलंबून असते. पण सध्याचे तापमान, कमी पावसाची शक्यता यामुळे पाण्याची टंचाई आणखी भासू शकते. अशा परिस्थितीत उसामध्ये आच्छादन, योग्य सिंचन पद्धत, वाणांची निवड, खतांचा वापर तसेच योग्य फवारण्या केल्यास उसाची वाढ टिकवणे शक्य आहे.

पिकाला पाणी कमी पडल्यास उसाची पाने बुडख्याकडून शेंड्याकडे वाळू लागतात. तंतुमय पदार्थांचे प्रमाण वाढते आणि ऊस आतून कोरडा पडतो. यामुळे ऊसाला भेगा पडतात म्हणजेच तडा जाण्याची शक्यता वाढते. यामुळे मुळांची कार्यक्षमता कमी होऊन अन्नद्रव्यांचे शोषण घटते. तसेच पानांमधून होणाऱ्या बाष्पीभवनामुळे पीक लवकर वाळते. त्यातील प्रकाशसंश्लेषणाच्या प्रक्रियेत अडथळे निर्माण होतात. परिणामी उसाची वाढ खुंटते आणि उत्पादनात घट होते.

पाचटाचे आच्छादन : पाचटाचे सरीमध्ये आच्छादन केल्याने बाष्पीभवन कमी होते. जमिनीतील ओलावा टिकून राहतो. यामुळे पाण्याच्या पाळीतील अंतर वाढते. तसेच जमीन वाफसा स्थितीत राहिल्यामुळे मुळांची वाढ चांगल्याप्रकारे होते.

योग्य सिंचन पद्धतींचा वापर : सिंचन व्यवस्थापनात ठिबक सिंचन पद्धती सर्वाधिक उपयुक्त मानली जाते. यामुळे ५० ते ५५ टक्के पाण्याची बचत होते आणि उत्पादनातही ३० ते



३५ टक्क्यांनी वाढ होऊ शकते. ठिबक उपलब्ध नसल्यास पाटाने पाणी देताना दोन पाळ्यांमधील अंतर २० दिवसांपेक्षा जास्त होऊ देऊ नये किंवा एक आड एक सरींना पाणी द्यावे. तसेच सकाळी किंवा संध्याकाळी सिंचन करणे योग्य ठरते. शक्य असल्यास रेनगन तुषार सिंचन पद्धतीचा वापर करावा. पिकाला पाण्याचा ताण सहन करण्यासाठी डिसेंबर ते फेब्रुवारीदरम्यान सिंचनाचे अंतर हळूहळू वाढवावे. तसेच पाणी देताना सरी पूर्ण भरू न देता फक्त ५० टक्के भाग ओलावा ठेवावा, यामुळे पाण्याची बचत होते.

योग्य वाणांची निवड : योग्य जातींची निवडही महत्त्वाची आहे. फुले १३००७, फुले १५०१२, को ८६०३२ आणि व्हीएसआय १२१२१ या जाती पाण्याचा ताण सहन करण्यात उत्तम आहेत.

सेंद्रिय खतांचा वापर : सेंद्रिय खतांचा जास्तीत जास्त वापर करावा, त्यामुळे जमीनीची पाणी धरुन ठेवण्याची क्षमता वाढते; परिणामी पिकास पाण्याची उपलब्धता वाढते. त्यासाठी लागवडीवेळी गांडूळ खताचा वापर हेक्टरी ५ ते ७ टन इतका करावा. तर शेणखताचा वापर २ ते ३ टन करावा.

रासायनिक खतांचा वापर : खतांची शिफारशीत मात्रा देऊन २५ टक्के जास्त पालाश खत द्यावे. यासाठी पालाशयुक्त सरळ खताचा (जसे म्युरेट ऑफ पोटॅश) वापर करावा. पालाश उसाच्या पानामधून होणाऱ्या बाष्पीभवनामध्ये महत्वाची भूमिका बजावते. त्यामुळे पीक लवकर वाळत नाही. तण नियंत्रण : उसाचे शेत हे तण विरहित ठेवावे; जेणेकरून उपलब्ध पाण्यासाठी होणारी स्पर्धा कमी होऊन ऊस वाढीसाठी उपयुक्त ठरेल.

फवारण्या : पाण्याची कमतरता असल्यास सहा ते आठ टक्के केओलिन (६०-८० मिली प्रति लिटर पाणी) या बाष्प रोधकाची फवारणी करावी. लोह,जस्त आणि बोरॉन या सूक्ष्म अन्न द्रव्यांची पहिली फवारणी ऊस लागवडीनंतर दोन महिन्यांनी व दुसरी फवारणी तीन महिन्यांनी करावी. याकरिता वसंतदादा शुगर इन्स्टिट्यूटच्या मल्टीमायक्रो व मॅक्रोन्यूट्रीएन्टचा वापर केल्यास फायदेशीर ठरेल. परंतु ही फवारणी करताना जमीन वाफसा स्थितीत असणे आवश्यक आहे. उसाची पाण्याचा ताण सहन करण्याची क्षमता वाढवण्याकरिता व्हीएसआय निर्मित 'वसंत ऊर्जा' या संजीवकाची लागवडीनंतर एक महिन्याच्या अंतराने तीन फवारण्या कराव्यात.

# दिन विशेष

### जागतिक दिवस:
भारतीय आगमन दिन : गुयाना, १८३८ पासून.
आंतरराष्ट्रीय सुईण दिन

### महत्वाच्या घटना

१२६० : कुबलाई खान हा मंगोलियाचा सम्राट बनला.
१८८३ : राष्ट्रीय चळवळीचे संस्थापक तसचं, एक पत्रकार म्हणून कर्तव्य बजावत असतांना तुरुंगात जाणारे सुरेंद्रनाथ बॅनर्जी हे पहिले भारतीय पत्रकार ठरले.
१८९३ : न्यूयॉर्क शेरबाजाराचा निर्देशांक कोसळला. देशभर मंदीस सुरुवात.
१९०१ : विष्णू दिगंबर पलुस्करबुवा यांनी लाहोर येथे गंधर्व महाविद्यालयाची स्थापना केली.
१९२० : पहिल्या महायुद्धाच्या समाप्तीनंतर पॅरिसमध्ये रेड क्रॉस अँड रेड क्रेसेंट सोसायटीज (आयएफआरसी) या आंतरराष्ट्रीय महासंघाची स्थापना करण्यात आली.
१९३६ : इटालियन सैन्याने इथिओपियातील आदिसअबाबा शहराचा ताबा घेतला.
१९४४ : महात्मा गांधींची तुरुंगातून सुटका.
१९५५ : पश्चिम जर्मनीला सार्वभौमत्त्व प्राप्त झाले.
१९६४ : युरोप परिषदेने ५ मे हा युरोप दिन घोषित केला.
१९९७ : जयदीप आमरे या साडेपाच वर्षीय बालकाने गोव्यातील मांडवी नदी पोहून पार केली. एवढ्या छोट्या बालकाने ही नदी पोहून पार करण्याची ही पहिलीच घटना आहे.
१९९९ : दक्षिण पाकिस्तानातील हडप्पा येथे केलेल्या उत्खननात पुरातत्त्ववेत्त्यांना सर्वात प्राचीन लिपीचे अवशेष मिळाले.
२००५ : ब्रिटन देशांतील लेबर पार्टीचे नेता टोनी ब्लेयर यांनी तिसऱ्यांदा पंतप्रधान पदाची शपथ घेतली.
२०१० : इंदिरा गांधी नॅशनल ओपन युनिव्हर्सिटी(विद्यापीठ) ने (इग्नू) सर्व कोर्समधील लैंगिक कामगार आणि त्यांच्या आश्रीतांचे शुल्क माफ करण्याची घोषणा केली.
२०१७ : सार्क उपग्रह म्हणून ओळखला जाणारा दक्षिण एशिया उपग्रह प्रक्षेपित करण्यात आला.

### जन्मदिवस । जयंती । वाढदिवस

८६७ : उडा जपानी सम्राट (मृत्यू: १९ जुलै ९३१)
१४७९ : गुरू अमर दास शिखांचे तिसरे गुरू (मृत्यू: १ सप्टेंबर १५७४)
१८१८ : कार्ल मार्क्स जर्मन तत्त्वज्ञ व कम्युनिझमचे प्रणेते (मृत्यू: १४ मार्च १८८३)
१८६४ : निले ब्लाय उर्फ एलिझाबेथ जेन कोचरन शोध्पात्राकारितेच्या जनक यांचा पीट्सबर्ग येथे जन्म.
१९११ : भारतीय शिक्षक व कार्यकर्ते प्रितलाता वडेदार यांचा जन्म. (मृत्यू: २३ सप्टेंबर १९३२)
१९१६ : ग्यानी झैलसिंग भारताचे ७ वे राष्ट्रपती, पंजाबचे मुख्यमंत्री, केंद्रीय गृहमंत्री (मृत्यू: २५ डिसेंबर १९९४)
१९२९ : ब्रिटीश कालीन भारतातील प्रसिद्ध क्रांतिकारक अब्दुल हम्मिद कैसर यांचा जन्मदिन.
१९३५ : राष्ट्रीय पुरस्कार तसचं, हिंदी साहित्य संस्था व गुजरात गौरव पुरस्कार सन्मानित भारतीय चित्रकार, लेखक, व्यंगचित्रकार, पत्रकार, पर्यावरणवादी, नाटककार आणि पटकथा लेखक आबिद सुरती यांचा जन्मदिन.
१९३७ : परमवीर चक्र सन्मानित भारतीय सैन्य अधिकरी कर्नल होशियार सिंह यांचा जन्मदिन.
१९५४ : भारतीय जनता पक्षाचे राजकीय नेता व हरियाणा राज्याचे विद्यमान (१० वे) मुख्यमंत्री मनोहर लाल खट्टर यांचा जन्मदिन.
१९७० : प्रसिद्ध भारतीय नेमबाज समरेश जंग यांचा जन्मदिन.
१९८९ : लक्ष्मी राय तमिळ अभिनेत्री यांचा जन्म.

### मृत्यू । पुण्यतिथी । स्मृतिदिन

१८२१ : नेपोलियन बोनापार्ट, फ्रांसचा सम्राट.
१८२१ : फ्रान्सचा सम्राट, असामान्य सेनापती आणि कर्तबगार प्रशासक नेपोलियन बोनापार्ट याचे सेंट हेलेना बेटावर निधन (जन्म: १५ ऑगस्ट १७६९)
१९१८ : त्र्यंबक बापूजी ठोंबरे उर्फ 'बालकवी', मराठीतील प्रसिध्द कवी.
१९१८ : त्र्यंबक बापूजी ठोंबरे ऊर्फ 'बालकवी' यांना जळगावजवळील भादली स्टेशनपाशी रेल्वेचे रूळ ओलांडताना आगगाडीखाली सापडून मरण आले. (जन्म: १३ ऑगस्ट १८९०)
१९४३ : रामकृष्णबुवा वझे गायक नट, बलवंत संगीत मंडळी आणि ललित कलादर्श या नाटक कंपन्यांमधे त्यांनी गायनगुरु म्हणून काम केले. केशवराव भोसले, मास्टर दीनानाथ, भालचंद्र पेंढारकर, हरिभाऊ घांग्रेकर हे त्यांचे काही नामांकित विद्यार्थी होत. (जन्म: २८ नोव्हेंबर १८७२)
१९४५ : पं. रामकृष्णबुवा वझे गायनाचार्य यांचा पुणे येथे निधन.
१९८९ : नवल होर्मुसजी टाटा उद्योगपती, पद्मभूषण १९६९ (जन्म: ३० ऑगस्ट १९०४ मुंबई)
२००० : वि. मा. कुलकर्णी मुलांच्या समस्यांचे अभ्यासक व समाजशास्त्रज्ञ (जन्म:)
२००६ : नौशाद अली संगीतकार (जन्म: २५ डिसेंबर १९१९)
२००७: लेसर चे निर्माते थिओडोर हेरॉल्ड मॅमन यांचे निधन. (जन्म: ११ जुलै १९२७)
२००८ : बास्किन-रॉबिन्स चे सहसंस्थापक इरब रोबिन्स यांचे निधन. (जन्म: ६ डिसेंबर १९१७)
२०१२ : भारतीय क्रिकेटपटू सुरेंद्रनाथ यांचे निधन. (जन्म: ४ जानेवारी १९३७)
२०१७ : भारतातील उच्च न्यायालयाच्या मुख्य न्यायाधीशपदी विराजमान होणाऱ्या पहिल्या महिला लीला सेठ यांचे निधन.

राज्य लोकतंत्र
मराठवाडा वृत्तांत

# परमेश्वराशी एकरूप होऊन पूर्णत्वास प्राप्त होणे म्हणजे काला - डॉ. प्रमोद कुमावत

जालना। प्रतिनिधी

नदी समुद्राला जाऊन मिळाली तेथे ती पूर्ण झाली, मंदिराचा कळस स्थापन झाला, काम पूर्ण झाले, हरिनाम सप्ताहात काल्याचे कीर्तन झाले, सप्ताह पूर्ण झाला. तसे जीवनात परमात्म्याची प्राप्ती झाली, आता जीवन पूर्ण झाले. यालाच काला म्हणतात. काला तीन प्रकारचा असतो पहिला दह्यालाह्याचा काला, दुसरा नामरूपाचा काला, तिसरा जीवब्रम्हात्मैक्याचा काला हाच काला वारकरी संप्रदायात अभिप्रेत आहे असे प्रतिपादन काल्याचे कीर्तन प्रसंगी वेदांताचार्य हभप डॉ प्रमोद महाराज कुमावत यांनी केले. गोलापांगरी येथे २७ एप्रिल ते ४ मे पर्यंत हनुमान मंदिरात अखंड हरिनाम सप्ताहाचे आयोजन करण्यात आले होते. या सप्ताहात हभप निवृत्ती महाराज देव्हडे,हभप प्रेममूर्ती श्रीहरी महाराज रसाळ,हभप विठ्ठल महाराज चव्हाण,विनोदाचार्य हभप वैजिनाथ महाराज पोपळघट, हभप सोपान महाराज फुके,हभप सतिश महाराज बनकर, हभप सोपान महाराज जाधव यांची कीर्तने संपन्न झाली. पुढे बोलताना डॉ प्रमोद कुमावत म्हणाले की, भगवान श्रीकृष्णांनी सामाजिक समरसता, सामाजिक ऐक्याचा संदेश दिला. सर्वांना एकत्रित घेऊन काम करता येते हे चरित्रातून दाखवून दिले. वारकरी संप्रदायामध्ये भेदाला स्थान नाही. विष्णुमय जग वैष्णवांचा धर्म, भेदाभेद भ्रम अमंगळ असे तुकाराम महाराज म्हणतात.



गोकुळीच्या सुखा, अंतपार नाही लेखा ।। बाळकृष्ण नंदाघरी, आनंदल्या नरनारी।। गुढिया तोरणे, करती कथा गाती गाणे।। तुका म्हणे छंदे, तेने मोहिले गोविंदे।। या काल्याच्या अभंगावर डॉ कुमावत यांनी निरूपण केले. गोकुळातील सुखाला परावार राहिला नव्हता कारण तेथे बाळकृष्णाचे प्राकट्य झाले होते. जिथे भगवंत असतो तिथे दुःख नसते व जिथे भगवंत नसतो तिथेच दुःख असते. लोकांना सुख हवे आहे परंतु सुखाचे साधन आवडत नाही, दुःख कुणालाच नकोय परंतु दुःखाचे कारण सुटत नाही. दुःखाचे कारण संसार आहे, संसार सुटत नाही व सुखाचे साधन भगवंत आहे, भगवंत आवडत नाही. त्यामुळे जीवनामध्ये सुखरूपता प्राप्त होत नाही. आपले जीवन शुद्ध असले पाहिजे. एकमेका सहाय्य करू अवघे धरू सुपंथ, हा संतांचा संदेश आहे. सर्वे सुखीन: संतु सर्वे संतु निरामया: हा वेदाने दिलेला संदेश आहे. संपूर्ण विश्व एक कुटुंब आहे या कुटुंबातील सर्वांचे कल्याण व्हावे असा संतांचा आग्रह आहे. एवढे मोठे अंत:करण व्हावे लागते तेव्हा भगवंत भेटत असतो. या सप्ताहात हभप सुरेश महाराज बोंद्रे यांचे रामायण कथा झाली तसेच रोज ज्ञानेश्वरी पारायण सोहळा व सकाळी काकडा संध्याकाळी हरिपाठ झाला. गायनाचार्य हभप मधुकर मुळे, ज्ञानेश्वर कावळे, तुकाराम कावळे, विठ्ठल नाना मोरे, अशोक सोनवणे, नरेंद्र जैस्वाल, मृदंगाचार्य हभप अजय महाराज काळे, हभप वैष्णव महाराज कावळे हे उपस्थित होते. कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी सर्वश्री सुभाष मोरे, अण्णाभाऊ मोरे,विजय सोनवणे, बालाजी खेडकर, ज्ञानेश्वर मोरे, काकासाहेब पोपळघट यांनी परिश्रम घेतले. कार्यक्रमाला परिसरातील भाविक भक्तांची मोठ्या संख्येने उपस्थित होती.

# तीन राज्यात भाजपाचा विजय झाल्याने जालन्यात जल्लोष



जालना। प्रतिनिधी

पश्चिम बंगाल, आसाम व पदुचेरी विधानसभा निवडणुकांमध्ये भारतीय जनता पक्षाने मिळवलेल्या दणदणीत विजयाच्या पार्श्वभूमीवर जालना शहरात आज विजय जल्लोष साजरा करण्यात आला. जालना शहरातील वीर सावरकर चौक येथे आयोजित या कार्यक्रमाला माजी मंत्री आ.बबनरावजी लोणीकर, कैलास गोरंटयाल, भाजपा जालना महानगर जिल्हाध्यक्ष भास्कर आबा दानवे, उपमहापौर राजेश राऊत, बद्रीनाथ पठाडे, युवानेते अक्षय गोरंटयाल यांची प्रमुख उपस्थिती होती.

कार्यक्रमाची सुरुवात फटाक्यांची आतषबाजी करून करण्यात आली. यावेळी उपस्थित कार्यकर्त्यांनी एकमेकांना पेढे भरवून आनंद व्यक्त केला. ''भारत माता की जय'', ''वंदे मातरम'' आणि ''भाजपा जिंदाबाद'' अशा घोषणांनी संपूर्ण परिसर दुमदुमून गेला. हा विजय पंतप्रधानांच्या नेतृत्वावर व केंद्र सरकारच्या विकासाभिमुख धोरणांवर जनतेने दाखविलेल्या विश्वासाचे प्रतीक आहे.यावेळी वीरेंद्र धोका, विजय कामड, सिद्धिविनायक मुळे, सोपान पेंढारकर, सुनील पवार, अमोल कारंजेकर, गोविंद ढेंबरे, सुनील खरे, अमोल धानुरे, नारायण पवार, सुजित जोगस, शिवराज नारीयवालेसिद्धेश्वर हाजबे, देविदास देशमुख, राजेश जोशी, शिवराज जाधव, अर्जुन गेही, रोषण चौधरी, रोहित भूरेवाल, दिनेश व्यास, विजय पवार, राजेश शर्मा, नागेश अंभोरे, विकास कदम, बद्रीनाथ जांगडे, उमेश अग्रवाल, विष्णू डोंगरे, शाम उगले, गौरव गोधेकर, राजेश देसार, रमेश दानवे, शिवाजी गायकवाड यांच्यासह पदाधिकारी कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थिती.

# किरकोळ बाजारातील भाजीपाल्याचे दर दीडपटीने वाढले

## भाजीपाला आवक घटल्याने भाववाढ; टोमॅटो ३० रुपयांवरून आले १५ रुपयांवर

घनसावंगी। प्रतिनिधी

घनसावंगी शहरासह तालुक्यातील आठवडी बाजारात ऐन लग्नसराईत भाजीपाल्याची आवक घटली आहे. उन्हाळ्यात शेतीला मुबलक पाणी मिळत नसल्याने उत्पन्नात घट झाली आहे. भाजीपाल्याच्या मागणीच्या तुलनेत पुरवठा होत नसल्याने भाजीचे दर चांगलेच महागले आहेत. घनसावंगी तालुक्यात गेवराई, जालना, छत्रपती संभाजीनगर तसेच पश्चिम महाराष्ट्रातून येणाऱ्या होलसेल भाजीपाल्याची आवक कमी झाली आहे. त्यामुळे किरकोळ बाजारातील भाजीपाल्याचे दर दीडपटीने वाढले आहेत. शहरातील भाजी मंडई तसेच तालुक्यातील आठवडी बाजारात पालेभाज्या ५० ते ६० रुपयांनी महागल्या आहेत.

यावर्षी उन्हाळ्यात तापमान ४२ अंशांच्या पुढे गेल्यामुळे पाण्याच्या पातळीत कमालीची घट झाली आहे. जेमतेम पाण्यावर भाजीपाल्याच्या उत्पन्नावर परिणाम होत आहे. लग्नसराईचे दिवस असल्याने भाजीपाल्याची मागणी वाढली आहे. त्यामुळे भाजीपाल्याचे दर वाढत चालले आहेत. मागील महिन्यापासून भाजीपाल्याचे भाव वाढत चालले आहेत. उन्हाळ्यात भाजीपाल्यांची आवक कमीच असते. मात्र यावर्षी उन्हाची तीव्रता जास्त वाढल्याने शेतातील जलस्त्रोत आटत चालले आहेत. परिणामी पाणी उपलब्ध होत नसल्याने उत्पन्नात घट झाली आहे. शहरातील मंडईसह तालुक्यातील सर्वच आठवडी बाजारात होलसेल भाजीपाल्याची आवक कमी झाली आहे. त्यामुळे किरकोळ बाजारातील भाजीपाल्याचे दर दीडपटीने वाढले आहेत. हिरवी मिरची ५० रुपये किलोने विकली जात आहे. गवार, वाल, दोडके, फ्लॉवर, शेवगा या भाज्यांचे भाव गेल्या काही दिवसांत दुप्पट वाढले आहेत. ज्या पालेभाज्या ३० रुपये किलो होत्या, त्या आता ४० ते ६० रुपये किलोने विकल्या जात आहेत. मेथी, पालक, कोथिंबीरची आवक कमी असल्याने पालेभाज्यांचे दर कडाडले आहेत. कोथिंबिरीच्या एका छोट्या जुडीसाठी १० रुपये, तर मेथीच्या एका जुडीसाठीही १० रुपये मोजावे लागत आहेत. मागील महिन्यात २० रुपये किलो असलेला कांदा मात्र आता १० ते १५ रुपये किलो दराने विकला जात आहे.



टोमॅटोचे भाव कोसळले : मध्यंतरी ३० रुपये दराने टोमॅटो विक्री झाल्याने शेतकऱ्यांनी शेतात टोमॅटो उत्पादनावर भर दिला. सर्व शेतकऱ्यांकडे टोमॅटो उत्पादन घरी आले आहे. मात्र बाजारात १० ते १५ रुपये किलोने विक्री होत आहे. बाजारात होलसेल भाव ८०० ते १ हजार रुपये क्विंटलच्या आसपास गेले आहेत. लग्नसराईमुळेही दरवाढ गेवराई, जालना, छत्रपती संभाजीनगर तसेच पश्चिम महाराष्ट्रातून येणारा होलसेल भाजीपाला व्यापारी आणतात. तो शहरासह आठवडी बाजारात किरकोळ विक्रेत्यांना विकतात. मात्र मागील काही दिवसांपासून भाजीपाल्याची आवक घटली आहे. भाव सातत्याने वाढत आहेत. लग्नसराई देखील सुरू आहे. त्यामुळे भाजीपाल्याची दरवाढ आणखी वाढतच चालली आहे.

# २१ तासांत बसविला नवीन ट्रान्स्फॉर्मर

## कळंब सबस्टेशनमध्ये आग लागल्याने ५ एमव्हीए ट्रान्स्फॉर्मर जळून खाक

कळंब। प्रतिनिधी

शहरातील सबस्टेशनवरील आढाळा फिडरवर क्षमतेपेक्षा अधिक विद्युत दाब आल्याने हॉर्नगॅपमध्ये स्पार्क होऊन भीषण आग लागल्याची घटना शनिवारी दुपारी घडली. या आगीत ५ एमव्हीए क्षमतेचा मुख्य पॉवर ट्रान्सफॉर्मर जळून खाक झाला. त्यामुळे कळंब शहरासह परिसरातील वीजपुरवठा पूर्णपणे खंडित झाला होता.महावितरणचे कार्यकारी अभियंता नरेंद्र रडे यांनी दिलेल्या माहितीनुसार, आढाळा फिडरची क्षमता २२० ॲम्पीयर असताना प्रत्यक्षात २५० ॲम्पीयरपर्यंत लोड वाढल्याने हा प्रकार घडला. दुपारी सुमारे २:१७ वाजता लागलेली आग रात्री नऊ वाजेपर्यंत नियंत्रणात आणण्यासाठी प्रयत्न सुरू होते.

घटनेची माहिती मिळताच आमदार कैलास घाडगे पाटील यांनी तात्काळ घटनास्थळी धाव घेत परिस्थितीचा आढावा घेतला. त्यांच्या पुढाकाराने रांजणी व बार्शी येथील अग्निशामक दलाला पाचारण करण्यात आले. तसेच स्थानिक साधनसामग्रीच्या मदतीने आग विझवण्यासाठी मोठे प्रयत्न करण्यात आले. दरम्यान, मे महिन्यातील वाढत्या उष्णतेमुळे वीजेचा वापर वाढल्याने लोड वाढल्याचे प्राथमिक कारण सांगण्यात आले असले तरी नेमके तांत्रिक कारण काय, याची सखोल चौकशी करण्याची मागणी नागरिकांकडून होत आहे. या बचाव कार्यामध्ये रामराज्य प्रतिष्ठानच्या युवकांनी मोलाची भूमिका बजावली. अथर्व क्षिरसागर, समर्थ राजमाने, अमित पाटील, पार्थ भिसे, पवन वेदपाठक, कुणाल जोशी, प्रसन्न हुलसुरकर, केदार खराडे, सचिन गाडे, श्लोकराज कवडे, शिवम शेंडगे, संकेत आवटे, अभिषेक आवटे आणि ओंकार चिपाडे यांनी विशेष परिश्रम घेतले. काही तासांमध्ये वीजपुरवठा सुरळीत केल्याने नागरिकांना दिलासा मिळाला. उन्हाळ्यातील त्रास कमी झाला आहे.

अपुऱ्या यंत्रणेमुळे अडचणी : सायंकाळी साडेचारच्या सुमारास आमदार कैलास घाडगे पाटील घटनास्थळी दाखल झाले. यावेळी महावितरणकडे आग विझवण्यासाठी आवश्यक यंत्रणा अपुरी असल्याचे निदर्शनास आले. त्यानंतर त्यांनी खाजगी स्तरावर सुमारे १२० अग्निरोधक बंब व इतर साहित्य उपलब्ध करून दिले. या प्रयत्नांमुळे आग आटोक्यात आणण्यात यश आले. यावेळी कृषी उत्पन्न बाजार समितीचे संचालक विलास पाटील, उबाठा गटाचे गटनेते संजय मुंदडा, नगरसेवक सागर मुंडे, जमील कुरेशी, माजी नगरसेवक प्रताप मोरे, तालुका प्रमुख सचिन काळे आदी उपस्थित होते.ऑइल गळत असूनही दुर्लक्ष सबस्टेशन येथे योग्य क्षमतेचे ब्रेकर असते तर ही आग लागली नसती. ट्रान्सफॉर्मरमधून ऑईल गळत असूनही दुर्लक्ष करण्यात आले. आग लागल्यानंतरही वरिष्ठ अधिकारी उपस्थित नव्हते. या प्रकरणाची सखोल चौकशी व्हावी. - कैलास घाडगे पाटील, आमदार शहर व परिसरातील वीजपुरवठा केला सुरळीत महावितरणने तत्परता दाखवत मोहा सबस्टेशनवरून ५ एमव्हीए क्षमतेचा नवीन ट्रान्सफॉर्मर आणून अवघ्या २१ तासांत आढाळा फिडरवर बसवला. त्यामुळे शहर व परिसरातील वीजपुरवठा लवकरच सुरळीत होणार आहे.

# समृद्धी भालेराव जेईएस कॉलेजमधून द्वितीय



जालना। प्रतिनिधी

कु. समृद्धी जितेंद्र भालेराव हिला बारावी बोर्ड ८९.८३% टक्केवारी घेऊन ती जे ई एस कॉलेज जालना या महाविद्यालयातून विज्ञान शाखेत सर्व द्वितीय आली आहे तसेच मार्केटिंग अँड सेल्समन शिप या विषयात २०० पैकी १९९ गुण घेऊन समृद्धी भालेराव महाविद्यालयातून या विषयात सर्वप्रथम आली आहे त्याबद्दल तिचे प्राचार्य व उपप्राचार्य यांनी हार्दिक अभिनंदन केले आहे त्याबद्दल तिचे सर्व स्तरातून अभिनंदन केले जात आहे. तिच्या या यशा बद्दल तिने संपूर्ण भालेराव परिवार व जे ई एस महाविद्यालय येथील प्राध्यापक यांचे आभार मानले आहे.

# जवळा बाजार शिवारात खून प्रकरणातील आरोपीला अटक

हिंगोली। प्रतिनिधी

औंढा नागनाथ तालुक्यातील जवळाबाजार येथे तरुणाच्या खून प्रकरणात फरार असलेल्या आरोपीला औंढा पोलिसांच्या पथकाने रविवारी ता ३ भर दुपारी उसाच्या फाडाला वेढा देऊन अटक केली. यावेळी पोलिसांनी ड्रोनच्या साह्याने आरोपीचा ठिकाणा देखील काढला होता. पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार औंढा नागनाथ तालुक्यातील जवळा बाजार येथील मनोहर साखरे (२६) या तरुणाचा खून झाल्याचा प्रकार शनिवारी तारीख दोन पहाटे उघडकीस आला होता. मयत मनोहर यांचा चेहरा दगडाने ठेचलेल्या अवस्थेत होता. याप्रकरणी औंढा नागनाथ पोलीस ठाण्यात कृष्णा सोनुने या तरुणाविरुद्ध गुन्हा दाखल झाला होता. मात्र गटारा घडल्यानंतर कृष्ण हा फरार झाला होता.

दरम्यान पोलीस अधीक्षक निलाभ रोहन, उपाधीक्षक राजकुमार केंद्रे, गुन्हे शाखेचे निरीक्षक मोहन भोसले, पोलीस निरीक्षक जी एस राहिरे यांच्या पथकाने घटनास्थळी भेट देऊन पाहणी केली होती. या प्रकरणातील फरार आरोपीचा शोध घेण्याचे आव्हान पोलिसांसमोर उभे राहिले होते.

जाहिर प्रगटन

**तालुका दंडाधिकारी तथा तहसिलदार यांचे कार्यालय अंबड**

**दुरध्वनी क्रमांक : ०२४८३-२७५०२६**
**जा..क्र.२०२५/ सेतु/कावि-७०**
**दिनांक - ०२/०४/२०२६**

तहसिलदार तथा कार्यकारी दंखाधिकारी, अंबड यांचे न्यायालय

अर्जदार श्रीमान/श्रीमती वर्षा दत्ता थोरात रा. सोनक पिंपळगाव ता. अंबड जि. जालना यांनी यांच्या मयत पती नामे दत्ता विष्णु थोरात सोनक पिंपळगाव यांचा मृत्यू दिनांक १०/१२/ २०२४ जन्म /मृत्यू नोंदीबाबतचा आदेश मिळणेकामी या कार्यालयात विनंती अर्ज सादर केला आहे. तसेच संबधित निबंधकाने त्यांच्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुषंगाने अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्राय या कार्यालयास सादर केला आहेत्याची जन्म / मृत्यूची तारीख खालीलप्रमाणे आहे.

| अ.क्र. | नाव | अर्जदाराशी नाते | मृत्यू दिनांक |
| --- | --- | --- | --- |
| १ | दत्ता विष्णु थोरात | पती | १०/१२/२०२४ |

निबंधकानी दिलेल्या जन्म / मृत्यू नोंदीच्या अनुउपलब्धता व स्वयंस्पष्ट अभिप्रायनुसार सदर जाहिर प्रगटन प्रसिध्द करण्यात यावे.तसेच या जाहिर प्रगटनाव्दारे सर्व जनतेस कळविण्यात येते की, उक्त नमुद अर्जदार यांच्या जन्म / मृत्यू नोंदीबाबत काही आक्षेप असेल तर यांनी जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासुन १५ दिवसाच्या आत या कार्यालयास लेखी आक्षेप सादर करावा. सदर कालावधीमध्ये या कार्यालयाकडे आक्षेप प्राप्त झाला नाही. तर संबधित प्रकरणात नियमानुसार उचित कार्यवाही करण्यात येईल याची नोंद घ्यावी.आज दिनांक-०२/०४/२०२६ रोजी माझ्या सहीने व या कार्यालयाच्या शिक्यानिशी जाहिर प्रगटन दिले आहे.

**स्वाक्षरित**
**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी, अंबड**

जाहीर प्रगटन

**मा. श्री. मा.ये.वाघ ५ वे दिवाणी न्यायाधीश व. स्तर, बीड, ता. जि. बीड यांच्या न्यायालयात.**

**किरकोळ दिवाणी अर्ज क्र. ५११/२०२६**
**ॲड. घुगे जी.एस. यांचे मार्फत**
**प्रयागाबाई घुगे व ईतर वि. निरंक**

ज्यापेक्षा रंगनाथ पि. विश्वनाथ घुगे, हे दिनांक ०५/०१/२०२१ रोजी मु.पो. बोरफडी, ता. जि. बीड येथे मयत झालेल्या आहे, आणि तसेच अर्जदार १.प्रयागाबाई भ्र. रंगनाथ घुगे, वय. ६८ वर्षे, धंदा. घरकाम, रा.मु.पो.बोरफडी, ता.जि.बीड २.अजिनाथ पि. रंगनाथ घुगे, वय. ३३ वर्षे, धंदा. शेती, रा. वरीलप्रमाणे ३.रघुनाथ पि. रंगनाथ घुगे, वय. ३६ वर्षे, धंदा. शेती, रा. वरीलप्रमाणे ४. रामनाथ पि. रंगनाथ घुगे, वय. ४१ वर्षे, धंदा. शेती. रा.मु.पो.गोंदी, ता.अंबड, जि. जालना अर्जदार क्र. १ ही मयताची पत्नी असुन, अर्जदार क्र. २ ते ४ हे मयताचे मुले आहेत. असे वरील अर्जदारांचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे.त्यापेक्षा सदरहु अर्जदार हे मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासुन एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहु मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहु कोर्ट, सदरंहु अर्जदारांच्या हक्काबद्दल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा / अर्जदारांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना / अर्जदारांना सदरहु मयत नामे रंगनाथ पि. विश्वनाथ घुगे, यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देण्यात येईल याची नोंद घ्यावी. प्रकरणाची पुढील तारीख १०/०६/२०२६ ही आहे. आज दिनांक ०४ मे २०२६ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्या निशी दिले.

आदेशावरुन

स्वाक्षरित
**कनिष्ठ लिपिक**
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड

स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड.

जाहीर प्रगटन

**मा.श्री. व्ही.सी. जोशी, ९ वे सह दिवाणी न्यायाधीश, व. स्तर, बीड यांचे न्यायालयात**

**किरकोळ दिवाणी अर्ज नंबर ५६४/२०२६**
**ॲड. जी.एस. घुगे यांच्यामार्फत**
**राजु फकीर शेख वि. निरंक**

ज्यापेक्षा मयत फकिर चॉदमिया शेख हे दिनांक २२.१०.२०२५ रोजी राहते घरी करचुंडी, ता.जि. बीड येथे मयत झालेले आहेत व मयत दौलतबी फकिर शेख हया दिनांक १८.०७.२०२५ रोजी राहते घरी करचुंडी, ता. जि. बीड आणि तसेच अर्जदार १. राजु फकीर शेख, वय ४८ वर्षे, धंदा शेती, रा. करचुंडी, पो. मांजरसुंबा, ता.जि. बीड २. सलिम पि. फकिर शेख, वय ५३ वर्षे, धंदा शेती, रा. सदर ३. मदिना भ्र. शेखलाल शेख, वय ६८ वर्षे, धंदा घरकाम, रा. रोहतवाडी, ता.जि. बीड अर्जदार क्रं. १ व २ हे मयत नामे फकिर चॉदमिया शेख व दौलतबी फकिर शेख यांचे मुले आहेत तसेच अर्जदार क्रं. ३ ही त्यांची मुलगी आहे. या अर्जदारां व्यतिरिक्त मयतास इतर दुसरे कोणीही वारस नाहीत असे वरील अर्जदाराचे म्हणणे आहे. वरील अर्जदार यांनी ते मयताचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र त्यांच्या हक्कात मिळण्यासाठी या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्यापेक्षा सदरहू अर्जदार मयताचे वारस नव्हेत असे कोणास समजाविण्याचे असेल तर हया जाहीरनाम्याचे तारखेपासून एक महिन्याचे आत, त्यांनी हया कोर्टात हजर होऊन आपल्या हरकती कळवाव्यात, आणि या लेखावरुन असे कळविण्यात येते की, जर सदरहू मुदतीत कोणी योग्य हरकती न दाखविल्या तर सदरहू कोर्ट, सदरहू अर्जदारांच्या हक्काबददल लागलीच पुरावा घेऊन, त्यांचा हक्क शाबीत दिसल्यास, त्यांना / अर्जदारांना सदरहू मयत फकिर चॉदमिया शेख व दौलतबी फकिर शेख यांचे वारस असल्याबाबतचे प्रमाणपत्र देईल याची नोंद घ्यावी. प्रकरणाची पुढील तारीख ०८/०६/२०२६ आहे.

आज दिनांक १६ एप्रिल २०२६ रोजी माझया सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिले.

आदेशावरुन

स्वाक्षरित
**कनिष्ठ लिपिक**

स्वाक्षरित
**अधिक्षक**
दिवाणी न्यायालय, व.स्तर, बीड.

# सात्रळमध्ये विजेच्या तारांचा झाडात प्रवाह:शेतकरी थोडक्यात बचावला

सात्रळ। प्रतिनिधी

महावितरणच्या मान्सूनपूर्व देखभालीच्या दाव्यांमधील फोलपणा पुन्हा एकदा चव्हाट्यावर आला आहे. सात्रळ-रामपूर शिवरस्त्यावरील गट क्रमांक ३०४ मध्ये वीजवाहिन्यांच्या तारा प्रचंड लोंबकळत असल्याने आंब्याच्या झाडात विद्युत प्रवाह उतरला. यात शेतकरी रणजित डुकरे यांना विजेचा धक्का बसला, सुदैवाने त्यांचे नशीब बलवत्तर म्हणून ते या जीवघेण्या संकटातून थोडक्यात बचावले. साई सात्रळ डेअरीचे चंद्रकांत डुकरे यांची या शिवारात शेती आहे. त्यांचे बंधू रणजित डुकरे हे शुक्रवारी शेतात फवारणीचे काम करत होते. काम आटोपल्यानंतर विश्रांतीसाठी ते लगतच्या आंब्याच्या झाडाखाली बसले असता, त्यांचा हात चुकून झाडाला लागला. झाडात वीज प्रवाह उतरलेला असल्याने त्यांना झटका बसून ते लांब फेकले गेले. उपस्थित शेतकऱ्यांनी त्यांना तातडीने रुग्णालयात दाखल केले.

परिसरात अनेक ठिकाणी वीजवाहक तारा केवळ १० ते १२ फूट उंचीवर लोंबकळत आहेत. वाकलेले खांब आणि लोंबकळणाऱ्या तारांमुळे झाडांमध्ये वीज उतरण्याचे प्रमाण वाढले आहे. अनेकवेळा तक्रारी करूनही महावितरणचे अधिकारी दुर्लक्ष करत असल्याचा आरोप सामाजिक कार्यकर्ते किरण कडू यांनी घटनास्थळी भेट दिल्यानंतर केला. पावसाळा तोंडावर असूनही सात्रळ परिसरात अद्याप कोणतीही देखभाल झालेली नाही. महावितरणच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांनी या मुजोर कर्मचाऱ्यांवर कारवाई करून तातडीने वीजवाहिन्यांची दुरुस्ती करावी, अशी मागणी हंभीरराव कडू, बाळासाहेब डुकरे, प्रवीण डुकरे यांनी केली आहे. अभियंता म्हणतात, हा भाग आमच्या हद्दीत येत नाही या गंभीर घटनेनंतर डुकरे यांनी सात्रळ उपकेंद्राच्या प्रमुख अभियंत्यांशी संपर्क साधला. मात्र, संबंधित अधिकाऱ्याने कोणतीही सहानुभूती दाखवण्याऐवजी उद्धटपणे उत्तरे दिली. हा भाग आमच्या हद्दीत येत नाही, असे सांगत आपली जबाबदारी झटकल्याचा आरोप पीडित शेतकरी कुटुंबाने केला आहे.

# पाटोद्यात शेतकऱ्यांची कोट्यवधींची लूट

## लाखो रुपयांचा शेतीमाल घेऊन आडत व्यापारी पसार; शेतकरी हवालदिल

पाटोदा । प्रतिनिधी

कष्टाने पिकवलेला शेतीमाल विश्वासाने व्यापाऱ्याच्या पदरात टाकला, मात्र तोच विश्वास आता शेतकऱ्यांच्या मुळावर उठला आहे. पाटोदा येथील एका प्रसिद्ध आडत व्यापाऱ्याने परिसरातील अनेक गावांतील शेतकऱ्यांची लाखो रुपयांची फसवणूक केल्याचा धक्कादायक प्रकार उघडकीस आला असून, संबंधित व्यापारी दुकान बंद करून कुटुंबासह पसार झाला आहे. याप्रकरणी संतप्त शेतकऱ्यांनी पाटोदा पोलीस ठाण्यात धाव घेत तक्रार दाखल केली आहे.नेमकी घटना काय ?पाटोदा शहरातील 'जयमल्हार ट्रेडिंग कंपनी'चे मालक संदीप रामराव नवले (रा. शिखरवाडी, ता. पाटोदा) हे गेल्या ८ ते ९ वर्षांपासून या भागात शेतीमाल खरेदी-विक्रीचा व्यवसाय करत होते.



अनेक वर्षांपासूनचा परिचय आणि व्यवहार चोख असल्याने परिसरातील नफरवाडी, नागशवाडी, बेलेवाडी, वाघिरा, वैजाळा यासह अनेक गावांतील शेतकऱ्यांचा त्यांच्यावर मोठा विश्वास होता.याच विश्वासापोटी शेतकऱ्यांनी आपला सोयाबीन, हरभरा व इतर शेतीमाल मोठ्या प्रमाणात नवले यांच्याकडे विक्रीसाठी दिला होता. माल खरेदी करताना व्यापाऱ्याने १० ते १५ दिवसांत किंवा जास्तीत जास्त महिन्याभरात तुमचे पैसे मिळतील, असे आश्वासन दिले होते. व्यवहाराचा पुरावा म्हणून शेतकऱ्यांना अधिकृत पावत्याही देण्यात आल्या होत्या.महिना उलटला, तरी पत्ता नाहीदिलेला शब्द पाळण्याऐवजी, महिना उलटून गेल्यानंतरही व्यापाऱ्याने कोणाचेही पैसे दिले नाहीत. शेतकरी जेव्हा आपल्या हक्काचे पैसे मागण्यासाठी पाटोद्यातील दुकानावर गेले, तेव्हा त्यांना दुकान बंद असल्याचे आढळून आले. शेजारील दुकानदारांकडे चौकशी केली असता, हे दुकान गेल्या महिनाभरापासून उघडलेच नसल्याची धक्कादायक माहिती समोर आली.गावी जाऊन केली चौकशी, पण...व्यापारी गायब झाल्याचे लक्षात येताच हवालदिल झालेल्या शेतकऱ्यांनी संदीप नवले यांचे मूळ गाव शिखरवाडी येथे धाव घेतली. तिथे त्याच्या कुटुंबाकडे चौकशी केली ◀◀ पान ३ वर

# अवैध वाळू वाहतुकीवर पोलिसांचा छापा; २० लाखांचा मुद्देमाल जप्त

गेवराई । प्रतिनिधी

जिल्ह्यात अवैध धंद्यांविरुद्ध सुरू असलेल्या मोहिमेअंतर्गत गेवराई पोलिसांनी मोठी कारवाई केली आहे. रविवारी पहाटे करण्यात आलेल्या या कारवाईत अवैध वाळू वाहतूक करणारा एक हायवा पकडण्यात आला असून, सहा ब्रास वाळूसह एकूण २० लाख ३० हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

पोलीस अधीक्षक नवनीत काँवत यांनी जिल्ह्यातील अवैध उत्खनन आणि वाहतुकीवर कारवाई करण्याचे आदेश दिले होते. या आदेशानुसार गेवराई पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक किशोर पवार यांनी वाळू




माफियांविरुद्ध कारवाईचे नियोजन केले होते. ३ मे २०२६ रोजी पहाटे ३:५० वाजेच्या सुमारास गेवराई पोलीस बायपास रोडवर पेट्रोलिंग करत असताना, नॅशनल हायवे क्रमांक ५२ वरील दत्तराज पार्कच्या कमानीजवळ एक वाळूने भरलेला हायवा संशयास्पद स्थितीत आढळला. पोलिसांनी हायवा थांबवून तपासणी केली असता, त्यातून अवैध वाळूची वाहतूक होत असल्याचे निष्पन्न झाले. या प्रकरणी हायवा (क्रमांक -P39TQ1239) चालक सय्यद शाकेर ◀◀ पान ३ वर



बीड – सामाजिक न्याय विभागाचे प्रदेशाध्यक्ष तथा सिनेट सदस्य प्रा. सुनील मगरे यांनी महात्मा फुले समता परिषदेचे प्रदेश सरचिटणीस तथा सिनेट सदस्य ॲड. सुभाष राऊत यांच्या शिवतीर्थ निवासस्थानी सदिच्छा भेट दिली असता याप्रसंगी त्यांचा सत्कार करताना ॲड. सुभाष राऊत, डॉ. संभाजी वाघमारे, प्रा. मनोहर शिरसट, प्रा. शरद मगर आदी दिसत आहेत.

# १५ दिवसांपासून इंधन कोरडे, प्रशासन कधी जागे होणार? पाटोद्यात शेती आणि वाहतूक पूर्णपणे ठप्प

पाटोदा । प्रतिनिधी

पाटोदा शहरात गेल्या १५ दिवसांपासून पेट्रोल आणि डिझेलचा अभूतपूर्व तुटवडा निर्माण झाला असून, यामुळे शहराचे जनजीवन पूर्णपणे विस्कळीत झाले आहे. खरीप हंगामाच्या तोंडावर शेतीची मशागत करण्यासाठी डिझेल मिळत नसल्याने बळीराजा हवालदिल झाला असून, प्रशासनाच्या सुस्त कारभारामुळे नागरिकांमध्ये तीव्र संताप व्यक्त होत आहे.शेतीची कामे रखडली; शेतकरी संकटातसध्या पाटोदा परिसरात पावसाळ्यापूर्वीच्या मशागतीची कामे जोमात सुरू आहेत. मात्र, गेल्या दोन आठवड्यांपासून ट्रॅक्टरसाठी डिझेल उपलब्ध नसल्याने अनेक शेतकऱ्यांची मशागत अर्ध्यावरच थांबली आहे. कॅन्स आणि बॅरल्स घेऊन शेतकरी एका पंपावरून दुसऱ्या पंपावर चकरा मारत आहेत. जर वेळेत पेरणीपूर्व कामे झाली नाहीत, तर यंदाचा खरीप हंगाम धोक्यात येण्याची भीती शेतकरी व्यक्त करत आहेत.पेट्रोल पंपांवर 'नो स्टॉक'चे फलकशहरातील बहुतांश पेट्रोल पंपांवर 'नो स्टॉक' (छे डींलझ) चे फलक पाहायला मिळत आहेत. ज्या काही मोजक्या ठिकाणी इंधन उपलब्ध आहे, तिथे दुचाकी आणि चारचाकी वाहनांच्या एक ते दोन किलोमीटर लांब रांगा लागत आहेत. तासनतास रांगेत उभे राहूनही अनेकदा इंधन संपत असल्याने ◀◀ पान ३ वर



# गेवराईत युवानेते रोहित पंडित यांच्या भाजपा जनसंपर्क कार्यालयाचा शुभारंभ

गेवराई । प्रतिनिधी

सतत जनतेच्या संपर्कात राहून त्यांच्या अडीअडचणीच्या वेळी मदतीला धावून जाणारे भाजपा युवा नेते रोहित राजाभाऊ पंडित यांच्या गेवराई शहरातील भारतीय जनता पार्टी जनसंपर्क कार्यालयाचा माजी राज्यमंत्री भाजपा नेते बदामराव पंडित यांच्या हस्ते शुभारंभ करण्यात आला आहे.

गेवराई शहरातील छत्रपती शिवाजी महाराज चौक येथे असलेल्या राजवर्धन कॉम्प्लेक्स मध्ये दिनांक ३ मे २०२६ रोजी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित यांचा वाढदिवस साजरा करून त्यानिमित्त भाजप युवानेते रोहित पंडित यांच्या भारतीय जनता पार्टी जनसंपर्क कार्यालयाचा शुभारंभ करण्यात आला. यावेळी माजी राज्यमंत्री बदामराव पंडित, माजी जि प सदस्य बप्पासाहेब




तळेकर, युवानेते यशराज पंडित, युवानेते शिवराज पवार, भाजप तालुकाध्यक्ष उद्धव रासकर, तालुकाध्यक्ष सचिन दाभाडे, तालुकाध्यक्ष राजेंद्र पवार, नगरसेवक गटनेते ॲड राजेंद्र राक्षसभूवनकर, माजी नगरसेवक राजेंद्र आर्दड, सामाजिक कार्यकर्ते धर्मराज आहेर, माऊली धुमाळ, अमोल सुतार, उज्वल सुतार आदींसह उपस्थिती होती.

याप्रसंगी बोलताना माजी राज्यमंत्री बदामराव पंडित म्हणाले की, गोरगरीब व सामान्य नागरिकांच्या छोट्या-मोठ्या अनेक अडचणी असतात वेगवेगळ्या शासकीय कार्यालयामध्ये त्यांची कामे असतात. परंतु अपुरी माहिती आणि संबंधित विभागातून मिळत नसलेले सहकार्य, यामुळे त्यांची कामे अडकून राहतात. अशावेळी भाजपच्या प्रत्येक कार्यकर्ता आणि पदाधिकाऱ्यांनी त्यांचे प्रश्न सोडवण्यासाठी पूर्ण वेळ देणे गरजेचे आहे. युवानेते रोहित पंडित हे नेहमी युवकांच्या ◀◀ पान ३ वर

# एक महिना उलटूनही चांदणी ग्राउंड चौक सिमेंट पूल अपूर्णच ग्रामीण भागातील नागरिक त्रस्त -सिद्दिकी

माजलगाव । प्रतिनिधी

शहरातील मुख्य रस्त्यावर असलेला सिमेंट पूल गेल्या एक महिन्यापासून अपूर्ण अवस्थेत आहे. हा रस्ता ग्रामीण भाग आणि शहराला जोडणारा महत्त्वाचा मार्ग असल्याने अनेक गावांतील नागरिकांना ये-जा करताना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत आहे. यामुळे नागरिकांमध्ये संताप व्यक्त होत आहे.

माजलगाव नगरपरिषद अंतर्गत 'स्वर्ण जयंती नगरोत्थान' योजनेअंतर्गत सुरू असलेल्या कामांमध्ये निकृष्ट दर्जाचे व बोगस काम होत असल्याचा आरोप



नागरिकांकडून करण्यात येत आहे. संबंधित काम तात्काळ थांबवून दर्जेदार पद्धतीने पूर्ण करण्यात यावे, अशी मागणी होत आहे.

तसेच निकृष्ट दर्जाचे काम करणाऱ्या 'ताज कन्स्ट्रक्शन' या गुत्तेदाराचे बिल थांबवून त्यांचा परवाना रद्द करावा. या प्रकरणी नगरपरिषद अभियंत्यांची सखोल चौकशी करून संबंधितांवर योग्य ती कारवाई व गुन्हे दाखल करावेत, अशी मागणी जोर धरत आहे. तसेच या सर्व प्रकाराकडे दुर्लक्ष करणाऱ्या मुख्याधिकाऱ्यांची तात्काळ बदली करण्यात यावी, अशीही मागणी नागरिकांकडून केल

# नसरापूर घटनेबाबत आज जिल्हाधिकाऱ्यानां देणार निवेदन

बीड । प्रतिनिधी

पुणे जिल्ह्यातील भोर तालुक्यात असणाऱ्या नसरापूर या गावांमध्ये केवळ चार वर्षाच्या अत्यंत निरागस बालिकेवर च्या विकृत व्यक्तीने केलेल्या अत्याचाराचा व्यापक स्तरावर निषेध व्यक्त करण्यासाठी उद्या मंगळवारी जिल्हाधिकारी महोदयांना बीड शहरातील समाजशील विचारांच्या तरुणांकडून निवेदन देण्यात येणार आहे.

मनुष्याच्या जन्माला येऊनही जनावरांसम वर्तन करून घृणास्पद वागणाऱ्या नराधमांना आद्दल घडवण्यासाठी शासनाने एवढी कठोर शिक्षा दयावी जेणेकरून पुन्हा अशा प्रकारच्या गैरकृत्यांना करण्याची हिंमतच कोणाची होऊ नये याची जाणीव करून देण्यासाठी आणि झालेल्या घटनेचा निषेध व्यक्त करण्यासाठी संवेदनशील मनाच्या तरुणांकडून शासनाला जागआणि जाण आणण्याच्या उद्देशाने हे निवेदन दिले जाणार आहे.

आज वेशीवर असणारे संकट उद्या आपल्या घरापर्यंत येऊन आपल्या कुटुंबाला अकल्पित परिस्थितीला तोंड द्यायला कशावरून लावणार नाही असा हादरवून टाकणारा विचार मुलींच्या पालकांची झोप उडवणारा ठरतो आहे. आगामी काळामध्ये पुन्हा अशा घटना घडू नयेत यासाठी सामाजिक स्तरावर सर्व समाज संघटना रस्त्यावर उतरून आपले सामाजिक उत्तरदायित्व पूर्णत्वाला नेणार आहेत. या निदर्शनासाठी जबाबदार नागरिकत्वाच्या भूमिकेतून बीडकरांनी हजारोंच्या संख्येने जिल्हाधिकारी कार्यालयासमोर उद्या मंगळवारी सकाळी १०:३० वाजता उपस्थित राहावे असे आवाहन करण्यात आले आहे.

# महावितरण फुलसांगवी सबस्टेशनचे प्रधान यंत्र चालक विश्वाद यांचा सेवापुर्ती सोहळा

मादळमोही । प्रतिनिधी

महावितरण कंपनीचे फुलसांगवी येथिल ३३ केव्ही सबस्टेशन प्रधान यंत्र चालक रविंद्र विश्वाद यांच्या सेवापुर्ती सोहळा काल संपन्न झाला,यावेळी मंचावर सहाय्यक अभियंता गणेश शेळके,संरपंच भास्कर सानप,भागवत सोनवणे बप्पा खेडकर, शहादेव आरेकर हे उपस्थित होते,



दि,३० एप्रिल रोजी फुलसांगवी सबस्टेशनचे प्रधान यंत्र चालक रविंद्र विश्वाद यांचा सेवापुर्ती सोहळा सबस्टेशनचे सर्व कर्मचारी व ग्रामस्थ यांच्या वतीने आयोजित करण्यात आला होता यावेळी मंचावर सहाय्यक अभियंता गणेश शेळके,संरपंच भास्कर सानप बप्पा खेडकर, पत्रकार संतोष भारती,भागवत सोनवणे सर इतर मान्यवर उपस्थित होते,यावेळी सेवानिवृत्त कर्मचारी रविंद्र विश्वाद यांनी संपुर्ण पोशाख व सन्मानित करण्यात आले यावेळी अशोक तळेकर महेश खेडकर लाईनमन नारायण मुंजाल लाईनमन लक्ष्मण मस्के ऑपरेटर दीपक फरताळे हौसराव जायभाय रवींद्र खेडकर संतोष सोनवणे नामदेव खेडकर प्रकाश ढवळे बाबुराव सोनवणे लक्ष्मण सोनवणे किसनराव लोखंडे बाळू जायभाय महादेव बडे परमेश्वर तळेकरउमर शेख बाबासाहेब जायभाय जावेद सर मनोज सोनवणे संपत सोनवणे कल्याण ढाकणे उगले विठ्ठल जगन्नाथ मार्कड गणेश तळेकरअमोल सानप अंकुश सानप पिंटू मगर नवनाथ तळेकर व मोठ्या प्रमाणात ग्रामस्थ विज ग्रहाक उपस्थित होते,

# उपशिक्षणाधिकारी (मा) धनंजय शिंदे यांनी पदभार घेतला

बीड । प्रतिनिधी

जिल्हा परिषद च्या माध्यमिक शिक्षण विभागात गेल्या अनेक वर्षांपासून रिक्त असलेल्या उपशिक्षणाधिकारी (मा) पदी धनंजय शिंदे यांनी दि.४ मे सोमवारी आपल्या उपशिक्षणाधिकारी पदाचा पदभार स्वीकारला. यावेळी बीड जिल्हा परिषदेचे मुख्यकार्यकारी अधिकारी जतिन रहेमान व माध्यमिक विभागाच्या शिक्षणाधिकारी प्रिया राणी पाटील यांनी त्यांचं स्वागत केलं व पुढील वाटचालीसाठी शुभेच्छा दिल्या. त्यांच्या या नियुक्तबद्दल महाराष्ट्र राज्य कृतिशील संघटनेच्या वतीने विभागीय संघटक डॉ.अशोक कोल्हे,डी. जी. तांदळे ,इंजि.भोरे,गौतम चोपडे,तुकाराम पवार-ठाकूर,शिवाजी बांगर,सय्यद सफीउद्दीन आदींनी अभिनंदन व स्वागत केले आहे.



# रामकथेची १ लाख रुपये बिदागी गाईच्या चाऱ्यासाठी गोशाळेला भेट -संजय महाराज पाचपोर यांचे योगदान

बीड । प्रतिनिधी

किर्तन परंपरा कशी असावी हे संत बंकटस्वामी महाराज यांनी वारकरी संप्रदायाला सांगितले. अभंगाचा भाव जसा असेल तश्या चाली स्वामी महाराज यांनी लावल्या.वारकरी सांप्रदायात संत बंकट स्वामी महाराज यांचे संपादकीय कार्य खूप मोठे आहे. असे प्रतिपादन श्री ह भ प रामायणाचार्य संजय महाराज पाचपोर यांनी केले. संत बंकट स्वामी महाराज यांच्या ८२ पुण्यतिथी उत्सवात रामकथेच्या समारोप प्रसंगी ते बोलत होते. यावेळी प्रमुख उपस्थित श्री ह भ प



लक्ष्मण महाराज मेंगडे, श्री ह भ प नाना महाराज कदम श्री ह भ प सुरेश महाराज जाधव श्री ह भ प गणेश महाराज पांडे श्री ह भ प दिनेशानंद शास्त्री यांच्या सहा हजारो भावीक भक्त उपस्थित होते.

श्रीक्षेत्र नेकनूर येथे संत बंकट स्वामी महाराज यांच्या पुण्यतिथी उत्सवानिमित्त भव्य संगीत तुलसी श्रीराम कथेचे आयोजन करण्यात आले होते कथा प्रवक्ते श्री ह भ प संजय महाराज पाचपोर यांनी कथेच्या समारोपप्रसंगी संत बंकट स्वामी महाराज यांचे वारकरी संप्रदायातील कार्य अलौकिक आहे.किर्तन परंपरा कशी असावी हे संत बंकट स्वामी महाराज यांची देण आहे.

देशासाठी, देवासाठी आणि धर्मासाठी जीवन उपयोगी आले पाहिजे.रावण जर नारद रुपी साधूच ऐकत असेल तर आपणही संताच ऐकलं पाहिजे.मर्यादा हा स्त्री जीवनाचा अलंकार आहे. सीतेने मर्यादा ओलांडली तर दुःख सहन कराव लागलं. आपली स्तुती ऐकताना दुःख होत आणि दुसऱ्याचं स्तुती करताना ज्याला आनंद होतो तो साधू आहे.सुग्रीव सत्ता सोडतो संपत्ती सोडतो भावाला सोडतो, पत्नीला सोडतो पण साधूला सोडत नाही.सत्ता संपत्ती गेली गेली तरी चालेल पण स्वामीला सोडू नका स्वामी तुम्हाला पूर्व वैभव प्राप्त करून देतील..ज्यावेळी माणसाला गरज आहे त्यावेळी माणस भेटली पाहिजे.. ◀◀ पान ३ वर

# श्रीमती दुधाळ यांनी मुलांना शिक्षणा-बरोबरच संस्कार दिले -मु.अ.थोरात

बीड । प्रतिनिधी

श्रीमती दुधाळ एस. एच. यांचा आपल्या शाळेतील सेवाकाळ कमी झाली असली तरीही त्यांनी केलेली शैक्षणिक सेवा आपल्या कायम स्मरणात राहील. कारण श्रीमती दुधाळ यांनी विद्यार्थ्यांना पाठ्यपुस्तकातील शिक्षणा बरोबरच वक्तशीरपणा, शिस्त, प्रामाणिकपणा हे संस्कारही दिले असे प्रतिपादन जि.प.प्रा. शाळा अंथरवन पिंपरीचे मुख्याध्यापक श्री राजकुमार थोरात यांनी केले.

बीड तालुक्यातील अंथरवन पिंपरी येथील जि. प. प्रा.शा. तील ज्येष्ठ सहशिक्षिका श्रीमती दुधाळ-गुंजाळ या नियतवयोमानानुसार ता.



एक मे रोजी सेवानिवृत्त झाल्या. सेवानिवृत्तीच्या शुभेच्छा समारंभ प्रसंगी मु.अ.थोरात बोलत होते.

व्यासपीठावर सरपंच श्रीमती पुष्पाताई शिंदे, ग्रामसेवक श्रीमती लेकुरवाळे, माजी सरपंच भाऊराव प्रभाळे,पिंपरीतांडाचे मु.अ. श्री दामोदर पोहरे, शालेय समितीचे अध्यक्ष कानिफनाथ शिंदे, उपाध्यक्ष सचिन शिंदे, ज्येष्ठ नागरिक प्रभाळे इत्यादींची उपस्थिती होती, याप्रसंगी शाळेच्या वतीने श्रीमती दुधाळ आणि त्यांचे पती लक्ष्मण गुंजाळ यांचा शाल ◀◀ पान ३ वर

This leaflet printed by the printer, publisher, owner Seema Bhimrao Maske at Jagmitra Printers And Sales Corporation Sumati Nagar, Jalana Road Beed printed here, Office Dainik Rajya Loktantra, Rajiv Gandhi Chowk Canol Road Beed, Tal. Dist.Beed 431122 (maharashtra) Published at. Editor Seema Bhimrao Maske,(mokashe) Executive Editor Subhash vilasrao choure. Editors do not necessarily agree with the opinions expressed in the text. Court case in Beed tribunal. Email -rajyaloktanatra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

हे पत्र मुद्रक, प्रकाशक, मालक सीमा भिमराव मस्के यांनी जगमित्र प्रिंटर्स अँड सेल्स कॉर्पोरेशन सुमती नगर, जालना रोड, बीड येथे छापून कार्यालय दैनिक राज्य लोकतंत्र, राजीव गांधी चौक कॅनॉल रोड बीड, ता.जि.बीड-४३११२२(महाराष्ट्र) येथे प्रकाशित केले. संपादक-सीमा भिमराव मस्के, (मोकाशे) कार्यकारी संपादक - सुभाष विलासराव चौरे या अंकात प्रकाशित झालेल्या मजकुरातील मतांशी संपादक सहमत असतीलच असे नाही. न्यायालयीन वाद बीड न्यायकक्षेत. : ईमेल - rajyaloktantra75@gmail.com NO.L SB/BEED/RNP-206/2024-26

# नराधमांना भर चौकात फाशी द्या!

## नसरापूर घटनेच्या निषेधार्थ मनविसेचे नवले ब्रीजवर तीव्र आंदोलन




पुणे । प्रतिनिधी

महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या वतीने आज नवले ब्रीज चौक येथे नसरापूर येथील संतापजनक घटनेच्या निषेधार्थ भर चौकात फाशी हे तीव्र आंदोलन करण्यात आले. वाढत चाललेल्या महिला व अल्पवयीन मुलींवरील अत्याचारांच्या घटनांविरोधात तीव्र संताप व्यक्त करत विकृत नराधमाच्या पुतळ्याला भर चौकात प्रतीकात्मक फासावर लटकवून निषेध नोंदविण्यात आला.

बदलापूर, ठाणे, चाकण आणि आता नसरापूर अशा सलग घडणाऱ्या घटनांमुळे संपूर्ण समाजात संतापाची लाट निर्माण झाली असून अशा विकृत नराधमांना तात्काळ कठोरात कठोर शिक्षा झाली पाहिजे, अशी ठाम भूमिका आंदोलनातून मांडण्यात आली. केवळ निषेध आणि आश्वासने नकोत, चौका चौकात फाशी दिली पाहिजे किंवा एन्काऊंटर केला पाहिजे अशी मागणी करण्यात आली. महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेच्या पदाधिकाऱ्यांनी पोलिस प्रशासनाला फ्री हँड देण्याची मागणी करत, अशा प्रकारचे गुन्हे करणाऱ्या नराधमांना भर चौकात फासावर लटकविण्यासारखी कठोर शिक्षा झाली पाहिजे, असे स्पष्टपणे सांगितले. तसेच महिलांच्या सुरक्षेसाठी अत्यंत महत्त्वाचा असलेला शक्ती कायदा अद्याप का पारित करण्यात आलेला नाही? या सरकारला नेमकी कोणती अडचण आहे? असा थेट जाब उपस्थित करत निष्क्रिय सरकारचा तीव्र शब्दांत धिक्कार करण्यात आला.

अमित ठाकरे यांच्या आदेशानुसार हे आंदोलन करण्यात आले असून राज्यभर अशा घटनांविरोधात अधिक तीव्र भूमिका घेतली जाईल, असा इशाराही यावेळी देण्यात आला.

शहर अध्यक्ष धनंजय दळवी आणि खडकवासला विभाग अध्यक्ष नीलेश जोरी यांनी आयोजित केलेल्या या आंदोलनात महाराष्ट्र नवनिर्माण विद्यार्थी सेनेचे प्र. राज्य संघटक प्रशांत कनोजिया, महा. राज्य सचिव आशिष साबळे, राज्य कार्यकारिणी सदस्य अभिषेक भाई थिटे, रवी बनसोडे, शैलेश वीटकर, विभाग अध्यक्ष संतोष वरे, हेमंत बोळगे, आशुतोष माने, अशोक पवार, केतन डोंगरे आदी पदाधिकारी, महाराष्ट्र सैनिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# कॉसमॉस बँकेच्या अध्यक्षपदी सचिन आपटे यांची निवड



पुणे । प्रतिनिधी

कॉसमॉस को-ऑप बँकेचे वरिष्ठ संचालक श्री सचिन आपटे यांची बँकेच्या अध्यक्षपदी एकमताने निवड झाली आहे. माजी अध्यक्ष, ड. प्रल्हाद कोकरे यांनी स्वेच्छेने दिलेल्या राजीनाम्यानंतर ही निवड करण्यात आली.

संचालक मंडळातील सर्व संचालकांनी श्री आपटे यांच्या अध्यक्षपदासाठी एकमताने मान्यता दिल्यामुळे सदर निवडणूक बिनविरोध झाल्याचे निवडणूक निर्णय अधिकारी तथा जिल्हाधिकारी, पुणे श्री जितेंद्र डूडी यांनी सहकार निवडणूक प्राधिकरण, नवी दिल्ली यांचे मान्यतेनंतर जाहीर केले.

श्री आपटे यांनी पुण्यातील नामांकित शासकीय अभियांत्रिकी महाविद्यालयातून स्थापत्य अभियांत्रिकी पदवी आणि स्ट्रक्चरल अभियांत्रिकीमध्ये पदव्युत्तर शिक्षण पूर्ण केले आहे. श्री आपटे प्रॅक्टिसिंग सिव्हिल इंजिनिअर असून प्रवर्तक आणि विकासक म्हणून ३० वर्षांहून अधिक काळ भारतात तसेच परदेशात कार्यरत आहेत. विविध संस्था, रुग्णालये आणि ट्रस्टसाठी व्यवस्थापन सल्लागार आहेत.

तसेच पुण्यातील नामांकित रुग्णालयांसाठी संपर्क सल्लागार म्हणून काम करतात, त्याचबरोबर हॉस्पिटॅलिटी आणि रेस्टॉरंट उद्योगातील एक यशस्वी उद्योजक आहेत. नामवंत शैक्षणिक संस्थांशी संबंधित असल्याने शैक्षणिक क्षेत्रात त्यांचे सक्रिय योगदान आहे. श्री आपटे व्यावसायिक क्षेत्राबरोबरच विविध सामाजिक संस्थांमध्ये कार्यरत आहेत. श्री आपटे २०१९ पासून कॉसमॉस बँकेच्या संचालक मंडळावर आहेत. सन २०२१-२०२२ या आर्थिक वर्षामध्ये त्यांनी बँकेच्या उपाध्यक्षपदाची धुरा यशस्वीपणे सांभाळली होती. बँकेच्या विविध समित्यांवर श्री आपटे कार्यरत आहेत.

# पुण्यात धोकादायक वास्तव! ६७३ टँकर फिटनेसशिवाय रस्त्यावर; आरटीओकडून कडक कारवाई




पुणे । प्रतिनिधी

गेल्या शनिवारी बिबवेवाडी-कोंढवा रस्त्यावर भरधाव टँकरच्या धडकेत निष्पाप हॉटेल व्यावसायिकाचा मृत्यू झाला. त्या पार्श्वभूमीवर माहिती घेतली असता असे लक्षात आले की, शहरातील तब्बल ६७३ टँकरचे फिटनेस प्रमाणपत्र कालबाह्य झाले असूनही ते बिनदिक्कतपणे रस्त्यावर धावत आहेत, अशी माहिती समोर आली आहे. टँकरचालकांनी तातडीने फिटनेस सर्टिफिकेट नूतनीकरण करून घ्यावे, असे आवाहन आरटीओने केले आहे.

उन्हाळ्यामुळे शहरात पाणी पुरवठा करणाऱ्या टँकरची मोठी वर्दळ असते. मात्र, आरटीओच्या आकडेवारीनुसार, एकूण २,०९४ पाणी टँकरपैकी ३९१ टँकर अनफिट आहेत. तसेच, इतर मालाची वाहतूक करणाऱ्या २,२९२ टँकरपैकी २८२ टँकरचे फिटनेस संपलेले आहे. म्हणजेच, एकूण ४,३८६ नोंदणीकृत टँकरपैकी ६७३ टँकर तांत्रिकदृष्ट्या रस्त्यावर धावण्यासाठी अपात्र आहेत. आरटीओकडून फिटनेस तपासणी करताना वाहनाच्या प्रत्येक तांत्रिक बाबीची बारकाईने तपासणी केली जाते. यात प्रामुख्याने टायर आणि ब्रेक टेस्ट केली जाते. यात टँकरचे टायर घासलेले तर नाहीत ना आणि ब्रेक कार्यक्षम आहेत का, याची खात्री केली जाते. रात्रीच्या वेळी अपघात टाळण्यासाठी रिफ्लेक्टर्स आणि सर्व दिवे सुस्थितीत असणे अनिवार्य आहे. त्यामुळे पुणे परिसरातील मार्गावरील दिवेमधील कार्यालयात वाहनांची फिटनेस तपासणी केली जाते. याशिवाय इंजिनची क्षमता आणि प्रदूषण नियंत्रण मानके (पीयूसी) तपासली जातात. मूळ रचनेत बदल करून टँकरची साईज किंवा उंची बेकायदेशीरपणे वाढवली आहे का, हे देखील यावेळी पाहिले जाते. तसेच, चालकाचा परवाना, विमा आणि योग्यता प्रमाणपत्र यांची वैधता तपासली जाते. अनेकदा जुन्या झालेल्या टँकरचे ब्रेक निकामी होणे किंवा स्टेअरिंगवर नियंत्रण न राहिल्यामुळे मोठे अपघात घडतात. प्रशासनाने आवाहन करूनही अनेक टँकरचालक फिटनेस तपासणीसाठी आरटीओकडे फिरकलेले नाहीत. आता अशा अनफिट टँकरवर कारवाईची टांगती तलवार असून, पुणेकरांच्या सुरक्षेसाठी आरटीओकडून विशेष तपासणी पथके तैनात केली जाणार आहेत.

# केडगाव प्रकरणात अतिरक्तस्त्रावामुळे मृत्यूचा प्राथमिक अहवाल

**केडगाव । प्रतिनिधी**

कुटुंब कल्याण शस्त्रक्रियेवेळी दौंड तालुक्यातील खोर गावातील रंजना बाबू केसकर यांचा मृत्यू अतिरक्तस्त्रावामुळे झाल्याचा प्राथमिक वैद्यकीय अहवाल जिल्हा प्रशासनाला मिळाला आहे. आता अंतिम अहवालाची प्रतीक्षा आहे. या प्रकरणाच्या चौकशीला आता वेग आला आहे. या संदर्भातील प्राथमिक अहवाल जिल्हा आरोग्य विभागाला प्राप्त झाला आहे. जिल्हा आरोग्य अधिकारी रामचंद्र हंकारे यांनी ही माहिती दिली. दि. २५ एप्रिल रोजी केडगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात कुटुंब नियोजन शस्त्रक्रियेदरम्यान रंजना केसकर यांचा मृत्यू झाला. या घटनेने संपूर्ण परिसरात खळबळ उडाली.

विशेषतः सरकारी आरोग्य यंत्रणेच्या कार्यपद्धतीवर प्रश्नचिन्ह निर्माण झाल्याने नागरिकांमध्ये तीव संतापाची लाट उसळली. या प्रकरणात संबंधित शस्त्रक्रिया करणारे डॉ. अनिल कदम यांच्यावर कठोर कारवाई करण्यात यावी, अशी जोरदार मागणी करण्यात आली. परिस्थितीचे गांभीर्य लक्षात घेऊन जिल्हा आरोग्य अधिकारी रामचंद्र हंकारे यांच्या




आदेशाने ५ सदस्यीय चौकशी समिती गठीत करण्यात आली. या समितीने आपला प्राथमिक अहवाल सादर केला असून, त्यामध्ये रंजना केसकर यांचा मृत्यू अतिरक्तस्त्रावामुळे झाल्याची नोंद करण्यात आली आहे. मात्र, ही प्राथमिक माहिती असून, अंतिम निष्कर्ष अद्याप प्रलंबित आहे. दरम्यान, पुणे जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी गजानन पाटील यांनी ससून रुग्णालयाच्या अधीक्षकांना अंतिम वैद्यकीय अहवाल लवकर सादर करण्याचे निर्देश दिले. शवविच्छेदनादरम्यान रंजना केसकर यांचा व्हिसेरा राखीव ठेवल्याने अंतिम अहवाल येण्यास काही कालावधी लागू शकतो, त्यामुळे या प्रकरणातील नेमकी जबाबदारी कोणावर येणार, याकडे सर्वांचे लक्ष लागून आहे. केडगाव येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात घडलेली ही घटना अत्यंत दुर्दैवी असून, अंतिम अहवाल प्राप्त झाल्यानंतर दोषींवर योग्य ती कारवाई केली जाईल, असे जिल्हा आरोग्य अधिकारी रामचंद्र हंकारे यांनी स्पष्ट केले. तसेच, या घटनेमुळे नागरिकांचा जिल्ह्यातील आरोग्य व्यवस्थेवरील विश्वास डळमळीत होऊ नये, यासाठी सर्व आरोग्य कर्मचारी आणि अधिकाऱ्यांनी अधिक जबाबदारीने काम करण्याची गरज असल्याचे त्यांनी नमूद केले.

# उरुळी देवाची-फुरसुंगीचा कचरा प्रकल्पावर बंदचा इशारा; महापालिकेसमोर नवा पेच



**पुणे । प्रतिनिधी**

महापालिकेकडून विकासकामांसाठी मागितलेल्या निधीबाबत कोणताही प्रतिसाद मिळाला नसल्याने आता उरुळी देवाची- फुरसुंगी नगपरिषदेने कचरा प्रकल्पाच्या बंदचे हत्यार उपसले आहे. आमच्या हद्दीतील चालू असलेले कचरा प्रकल्प तातडीने बंद करा आणि नवीन कोणतेही प्रकल्प सुरू करू नये, असा इशारा नगरपरिषदेकडून महापालिकेला देण्यात आला आहे.

उरुळी देवाची-फुरसुंगी नगरपरिषदेचे अध्यक्ष संतोष सरोदे व उपनगराध्यक्ष ओंकार कामठे यांनी याबाबत महापालिका आयुक्तांना निवेदन दिले आहे. महापालिकेच्या उरुळी देवाची येथील कचरा डेपोमुळे या भागातील पाण्याचे स्रोत दूषित झाले आहेत. त्यामुळे महापालिकेने पूर्वीप्रमाणे या दोन्ही गावांना म्हणजेच आताच्या नगरपरिषदेला रोज १८० टँकरद्वारे पाणीपुरवठा करावा व येथील विकास कामांसाठी दरवर्षी ४० कोटींची तरतूद करावी, अशी मागणी या नगरपरिषदेच्या वतीने महापालिकेकडे करण्यात आली होती. त्यावर महापालिकेने काहीच कार्यवाही केली नाही. त्यामुळे आता महापालिकेचे नाक दाबण्यासाठी येथील पदाधिकाऱ्यांनी पुन्हा एकदा कचरा प्रकल्प बंदचा मार्ग अवलंबला आहे. आयुक्तांना दिलेल्या निवेदनात महापालिकेचा सुरू असलेल्या कचरा प्रकल्प बंद करावा, अशी मागणी करतानाच तसे आश्वासन यापूर्वी दिले असल्याची आठवण करून दिली आहे. तसेच यापुढील काळात कोणतेही नवीन प्रकल्प आमच्या हद्दीत सुरू करू नये, असा इशारा देण्यात आला आहे. त्यामुळे उरुळी देवाची-फुरसुंगीच्या दबावतंत्रावर महापालिका काय भूमिका घेणार हे पाहणे महत्त्वाचे ठरणार आहे.

# आरोपीला फाशी होईपर्यंत मी तुमच्या सोबत; पोलीस आयुक्तांनी पीडितेच्या कुटुंबियांना दिले आश्वासन

पुणे । प्रतिनिधी

नसरापूर लैंगिक अत्याचार प्रकणातील पिडीतेच्या घरी पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी सोमवारी (दि.४) सायंकाळी भेट दिली. यावेळी त्यांनी कुटूंबियांचे सांत्वन करत नराधम आरोपीला फाशी मिळेपर्यंत मी तुमच्या सोबत आहे. तुम्हाला कधीही माझ्याशी काही बोलायचे असेल तर मला सांगा मी तुमच्या घरी येईल असे आश्र्वस्त केले. यावेळी आयुक्तांचे देखील डोळे पाणावले. भोर तालुक्यातील नसरापूर येथे माणुसकीला काळीमा फासणारी संतापजनक घटना महाराष्ट्र दिनी घडली. सुट्टीसाठी आजीकडे आलेल्या साडेतीन वर्षीय चिमुरडीवर भिमराव कांबळे या ६५ वर्षीय नराधमाने 'वासरू दाखवतो' असे म्हणत गोठ्याकडे नेऊन तिच्यावर अत्याचार केला. त्यानंतर तिचा खून केला. या घटनेचे तीव्र पडसाद पुणे जिल्ह्यासह राज्यात उमटले. नागरिकांकडून आरोपी नराधमाला तात्काळ फाशी द्यावी अशी मागणी होत आहे. या घटनेच्या पार्श्र्वभूमीवर शनिवारी (दि. २) संतप्त नागरिकांनी नवले पूल परिसरात साडेचार तास आंदोलन केले होते. यावेळी पोलिस आयुक्त अमितेश कुमार यांनी पीडितेच्या वडिलांना तुमच्या मागण्या आम्ही नक्की पूर्ण करू असे मुख्यमंत्री आणि प्रशासनाच्या वतीने आश्वासन दिले होते. दरम्यान, सोमवारी पोलिस आयुक्तांनी पीडितेच्या आई-वडिलांना धीर देत, या प्रकरणासाठी लवकरच विषेश सरकारी वकील नियुक्त केला जाईल असेही सांगितले.

# येरवड्यात मोहल्ला कमिटी बैठकीवर नागरिकांचा संताप; अधिकाऱ्यांच्या अनुपस्थितीमुळे नाराजी



**येरवडा । प्रतिनिधी**

येरवडा क्षेत्रीय कार्यालयात अखेर सात महिन्यांनंतर मोहल्ला कमिटी बैठक घेण्यात आली. मात्र, या बैठकीला विविध विभागांचे अधिकारी उपस्थित नसल्याने नागरिकांनी नाराजी व्यक्त केली. प्रश्न आणि समस्या मांडायच्या तरी कशा? असा सवाल या वेळी नागरिकांनी उपस्थित केला. स्वच्छतागृहांची झालेली दुरवस्था, अतिक्रमणांसह विविध समस्या या वेळी मांडण्यात आल्या.

येरवडा क्षेत्रीय कार्यालयात गेल्या वर्षी ९ ऑक्टोबर रोजी मोहल्ला कमिटीची बैठक घेण्यात आली होती. त्यानंतर प्रशासनाकडून निवडणुकीचे कारण देत गेल्या सात महिन्यांपासून या बैठकीचे आयोजन करण्यात आले नव्हते. यामुळे कमिटीच्या सदस्यांसह नागरिकांतून नाराजी व्यक्त होत होती. अखेर प्रशासनाला लाज आली आणि गेल्या ३० एप्रिल रोजी ही बैठक पार पडली. येरवडा मासळी बाजार परिसरातील स्वच्छतागृहाच्या देखभालीबाबत केअर टेकरकडून हलगर्जीपणा होत आहे. यामुळे या स्वच्छतागृहाची दुरवस्था झाली असून, दरवाजे तुटलेले आहेत. या स्वच्छतागृहाची तातडीने दुरुस्ती करण्याची मागणी या वेळी करण्यात आली. सलमा शेख म्हणाल्या, 'येरवडा भाजी मार्केट परिसरातील अतिक्रमणांवर कारवाई करण्यात यावी.' परिसरातील काही स्वच्छतागृह पाडून त्यावर घरे बांधण्यात आल्याचा आरोप दिलीप कुराडे यांनी केला. तसेच जुने रेकॉर्ड काढून याबाबत आयुक्तांना माहिती देण्यात यावी, अशी मागणीही त्यांनी केली. एजाज खान म्हणाले, 'परिसरातील विविध प्रश्न आणि समस्या सोडविण्यासाठी प्रभाग समिती अध्यक्षांनी पुढाकार घ्यावा.' इंद्रप्रस्थ उद्यान बंद करून ही जागा एका व्यावसायिकाला भाडेतत्त्वावर देण्यात आली आहे. याबाबत माहिती मिळावी, अशी मागणी कमिटीच्या सदस्यांनी प्रशासनाकडे केली. या वेळी क्षेत्रीय कार्यालयाचे सहायक आयुक्त राजेश गुर्रम, आरोग्य अधिकारी डॉ. गोपाळ उजवणकर, करीम खान, प्रमोद देवकर पाटील, शशिकांत साटोटे, एजाज खान, कीर्ती माचरेकर, अधिकारी आणि नागरिक उपस्थित होते.

# पुणे पोलीस दलात मोठी खळबळ! २८ लाखांची लाच घेताना महिला अधिकारी एसीबीच्या जाळ्यात




पुणे । प्रतिनिधी

**तक्रार अर्जाच्या चौकशी प्रकरणात तब्बल २८ लाखांची लाच स्वीकारताना पुणे पोलिसांच्या आर्थिक गुन्हे शाखेतील महिला सहायक पोलीस निरीक्षकास लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (एसीबी) शनिवारी पकडले. बंडगार्डन रस्ता परिसरातील एका तारांकित हॉटेलसमोर सापळा रचून ही कारवाई केली. या प्रकरणात एका खासगी व्यक्तीलाही ताब्यात घेतले आहे.**

महिला सहायक पोलीस निरीक्षक वैशाली मुरलीधर तोटेवार (४९, रा.स्वारगेट पोलीस लाईन) आणि संभाजी शिवाजी चव्हाण( रा.चिमण्या गणपती चौक, सदाशिव पेठ) अशी आरोपींची नावे आहेत. एसीबीच्या माहितीनुसार, आर्थिक गुन्हे शाखेत असताना तोटेवार यांच्याकडे काही तक्रार अर्ज चौकशीसाठी सोपविले होते. यातील एका प्रकरणात त्यांनी ३० लाखांची लाच मागितली होती. सुरुवातीला तक्रारदाराकडून २ लाख घेतल्यानंतर बाकीच्या २८ लाखांची मागणी केली.

यानंतर तक्रारदाराने एसीबीकडे तक्रार केली. याची पडताळणी केल्यानंतर एसीबीने सापळा रचला. लाच स्वीकारण्यासाठी तोटेवार यांनी खासगी व्यक्ती संभाजी चव्हाणला पाठवले होते. बंडगार्डन परिसरातील हॉटेल कोनार्डच्या प्रवेशव्दारावर लाच घेताना चव्हाणला पकडले. त्यानंतर तोटेवार यांनाही ताब्यात घेण्यात आले. कारवाईनंतर एसीबी पथकाने पुणे पोलीस आयुक्तालयातील तोटेवार यांच्या कार्यालयासह त्यांच्या निवासस्थानी झडती घेतली. या प्रकरणात लाचलुचपत प्रतिबंधक कायद्यान्वये कारेगाव पार्क पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू असून, त्यानंतर अटकेची कारवाई केली जाणार आहे. ही कारवाई सहायक पोलीस आयुक्त निता मिसाळ यांच्या मार्गदर्शनाखाली करण्यात आली. याचा तपास सहायक पोलीस आयुक्त सतीश वाळके करत आहेत. वैशाली तोटेवार यांची नुकतीच पदोन्नती होऊन त्यांची मुंबई लोहमार्ग पोलीस दलात पोलीस निरीक्षक म्हणून बदली झाली होती. शुक्रवारी त्यांना पुणे पोलीस दलातून कार्यमुक्त करण्यात आले होते. नव्या पदावर रुजू होण्यापूर्वीच त्यांच्यावर झालेल्या या कारवाईमुळे पोलीस दलात मोठी खळबळ निर्माण झाली आहे.

# वडील बिस्कीट घ्यायला खाली उतरले अन् ३ वर्षांची लेक एकटीच राहिली! कुर्डुवाडी ते पुणे प्रवासात दिसून आली पोलिसांची तत्परता




पुणे । प्रतिनिधी

पुणे रेल्वे संरक्षण दलाने दाखवलेली तत्परता आणि ऑपरेशन नन्हे फरिश्ते अंतर्गत राबवलेल्या मोहिमेमुळे रेल्वेमध्ये हरविलेल्या एका तीन वर्षांच्या मुलीला सुरक्षितपणे पालकांकडे सोपविण्यात यश आले. सोलापूर-सीएसएमटी वंदे भारत एक्सप्रेसमध्ये घडलेल्या या घटनेने रेल्वे प्रशासनाच्या संवेदनशीलतेचे दर्शन घडवले आहे.

ट्रेन क्रमांक २२२२६ सोलापूर-सीएसएमटी वंदे भारत एक्सप्रेस गाडीने कुर्डुवाडी स्थानकावरून वेग पकडल्यानंतर कोच सी-५ मधील सीट क्रमांक ३० वर एक तीन वर्षांची मुलगी रडताना दिसली. त्यावेळी ड्युटीवर असलेले टीटीई एच. एल. मीना यांनी मुलीकडे चौकशी केली असता, ती एकटीच असल्याचे समजले. मुलीचे वडील हे कुर्डुवाडी स्थानकावर बिस्किट आणण्यासाठी उतरले होते. मात्र, ते वेळेत न आल्यामुळे गाडीचे दरवाजे लॉक झाले आणि गाडी सुटली. त्यामुळे वडील आणि मुलीची ताटातूट झाली. यावेळी टीटीई मीना यांनी तात्काळ नियंत्रण कक्षाला माहिती दिली. त्यानंतर आरपीएफ कॉन्स्टेबल विनय प्रकाश आणि एएसआय एन. एन. नलावडे यांनी परिस्थिती हाताळत मुलीला असुरक्षित वाटू नये, ती घाबरू नये यासाठी एका सहप्रवासी महिलेच्या मदतीने तिला शांत करून तिची काळजी घेतली. यावेळी सर्व माहिती घेतल्यानंतर मुलीच्या वडीलांशी संपर्क साधून त्यांना मुलगी सुरक्षित आहे. तुम्ही घाबरून न जाता पुढील गाडीने पुणे स्थानकावर येण्याचे सांगितले. गाडी पुणे स्थानकावर पोहोचताच आरपीएफ पथकाने कायदेशीर प्रक्रिया पूर्ण केल्यानंतर तीन वर्षांच्या चिमुरडीला सुखरूपणे तिच्या आईकडे सोपविण्यात आले. आपल्या काळजाचा तुकडा सुखरूप मिळाल्याचे पाहून पालकांच्या डोळ्यांत आनंदाश्रू उभे राहिले. या यशस्वी कामगिरीमुळे पुणे विभागातील आरपीएफ आणि रेल्वे कर्मचाऱ्यांच्या तत्परतेचे सर्वत्र कौतुक होत आहे. प्रवासी सुरक्षा ही केवळ घोषणा नसून ती आमची बांधिलकी आहे, हे रेल्वेने पुन्हा एकदा सिद्ध केले आहे.